रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १९ ◆ अंक ५६
www.ramprahar.com

◆ शुक्रवार, ११ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

आदर्श शिक्षकांचा सन्मान; शिष्यवृत्तीधारकांचा गौरव/२
वर्षभरापासून शाळकरी मुलीचा पाठलाग; तरुणाला अटक/३
ईशानच्या ईस्ट झोनने दुलीप ट्रॉफी जिंकली/८

## एमपीएससीच्या जुन्या परीक्षांतील गुणांचेही 'री-चेकिंग' होणार

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षांमधील कथित गैरप्रकार आणि विद्यार्थ्यांच्या तक्रारींची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यापक चौकशी आणि परीक्षा प्रक्रियेत सुधारणा करण्याची घोषणा केली आहे. एमपीएससीच्या जुन्या परीक्षांमधील गुणांचे 'री-चेकिंग', संशयास्पद प्रकरणांची एसआयटीमार्फत चौकशी, ग्रुप बी आणि सीच्या २०२५ पूर्व व मुख्य परीक्षांची तपासणी तसेच पोलिसांच्या प्राथमिक अहवालाचे प्रकटीकरण करण्याची प्रक्रिया पुढील आठ दिवसांत सुरू करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१०) विद्यार्थ्यांशी झालेल्या चर्चेनंतर सांगितले. गैरप्रकारात अधिकारी, विद्यार्थी किंवा दलाल यापैकी कोणीही सहभागी असल्याचे आढळल्यास त्याला पाठीशी घातले जाणार नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी साकारले पर्यावरणपूरक बाप्पा!

# महाराष्ट्राचा 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'

### नवी मुंबईतील गणेशमूर्ती कार्यशाळेत मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशमूर्तींच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्त्व असून गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि.१०) येथे केले.

वाशीतील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'पर्यावरणपूरक महागणेशमूर्ती कार्यशाळा




२०२६'मध्ये मुख्यमंत्री बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी तब्बल १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये महाराष्ट्राच्या नावावर सुवर्ण अक्षरांनी नवा जागतिक विक्रम नोंदवला.

या ऐतिहासिक सोहळ्याला पर्यावरण व वातावरणीय बदलमंत्री पंकजा मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, आयुक्त कैलास शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, कला संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, गणराया ही बुद्धीची देवता असून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. सृष्टीची निर्मिती करणाऱ्या पंचमहाभूतांचे रक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते. **(पान २ वर..)**

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह महाराष्ट्र दौऱ्यावर

**मुंबई : प्रतिनिधी**



केंद्रीय गृहमंत्री अमित शाह १३ आणि १४ सप्टेंबर अशा दोन दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते मुंबईच्या फोर्टमधील दि एशियाटिक सोसायटीला भेट देतील तसेच वाशी येथे होणाऱ्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनाला उपस्थिती लावणार आहेत.

प्राच्यविद्या संशोधनाचा समृद्ध वारसा जपणाऱ्या एशियाटिक सोसायटीच्या भेटीत गृहमंत्री शाह संस्थेच्या पदाधिकाऱ्यांशी आणि सदस्यांशी संवाद साधणार असून दुर्मीळ पोथ्यांच्या प्रदर्शनालाही ते भेट देणार आहेत. त्यानंतर वाशीतील सिडको प्रदर्शन केंद्रात हिंदी दिवसाचे औचित्य साधून होणाऱ्या सहाव्या अखिल भारतीय राजभाषा संमेलनात गृहमंत्री सहभागी होतील. हे संमेलन १४ आणि १५ सप्टेंबर असे दोन दिवस चालणार असून देशभरातील हिंदी भाषिक साहित्यिक, संस्था, अधिकारी आणि प्रतिनिधी या संमेलनात सहभागी होणार आहेत.

# अफवांच्या पिकाला सत्याच्या विचारांनी छेद द्या; सोशल मीडियावर सक्रिय अन् बोलके राहा!

### भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे कार्यकर्त्यांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजच्या आधुनिक आणि डिजिटल युगात सोशल मीडिया हे जनसंवादाचे प्रभावी माध्यम बनले आहे. प्रत्येकजण सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सक्रिय आहे, मात्र विविध डिजिटल माध्यमांचा विरोधकांकडून चुकीच्या पद्धतीने वापर करून जनतेमध्ये अफवा, गैरसमज आणि संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. विरोधक अफवांचे पीक आणत असतील, तर त्या अफवांना सत्याच्या विचारांनी छेद देण्याची जबाबदारी भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांची आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने सोशल मीडियावर सक्रिय आणि बोलके राहिले पाहिजे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी केले.

उत्तर रायगड जिल्हा भाजपची विस्तृत कार्यकारिणी बैठक गुरुवारी (दि.१०) पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत नाट्यगृहात मोठ्या उत्साहात पार पडली. त्यावेळी प्रदेशाध्यक्ष चव्हाण बोलत होते. आपल्या भाषणात त्यांनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

प्रदेशाध्यक्ष चव्हाण म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाखाली देश आणि महाराष्ट्राच्या विकासाला नवी दिशा मिळाली आहे. सन २०१४नंतर देशाच्या विकासाची गती अधिक वेगवान झाली असून केंद्र सरकारने पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण, आरोग्य यांसह प्रत्येक क्षेत्रावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे देशाच्या विकासाची मजबूत पायाभरणी झाली आणि भारताला विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने निर्णायक वाटचाल सुरू आहे.

भाजप हा केवळ राजकीय पक्ष नसून राष्ट्रहिताला सर्वोच्च प्राधान्य देत देशाच्या विकासासाठी कार्य करणारी संघटना आहे. आमदार प्रशांत ठाकूर करीत असलेली कामे तुम्ही लोकांना दाखवत राहाल, तर भाजपची ताकद वाढण्याबरोबरच आणखी लोकं जोडली जाणार आहेत. त्याचप्रमाणे त्यांनी देश व राज्याच्या विकासाचा चढता आलेख राजकीय अभिनंदन ठरावातून प्रभावीपणे मांडला. केंद्र व राज्य सरकारच्या विकासाभिमुख धोरणांची आणि त्यातून झालेल्या परिवर्तनाची ही माहिती समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहचविण्याचे काम कार्यकर्त्यांनी केले पाहिजे, असे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी नमूद केले. सरकारचे काम आणि पक्षाची विचारधारा जनतेपर्यंत पोहचविणारा कार्यकर्ता हा भाजपचा खरा दुवा आहे. संघटन मजबूत करण्यासोबतच विकासाचा संदेश घराघरात नेण्यासाठी कार्यकर्त्यांनी सक्रियपणे काम करावे, असे आवाहनही त्यांनी केले. **(पान २ वर..)**




### भाजपची विचारधारा समाज-राष्ट्रहित आणि विकासाला प्राधान्य देणारी : आमदार प्रशांत ठाकूर

आपल्या भाषणात भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाच्या विकासाला गती मिळाली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रानेही विकासाची नवी दिशा घेतली आहे, मात्र देशात भाजपविरोधी वातावरण निर्माण करण्यासाठी विरोधकांकडून सातत्याने अफवा आणि गैरसमज पसरविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विरोधक जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत, परंतु भाजपची विचारधारा ही समाजहित, राष्ट्रहित आणि विकासाला प्राधान्य देणारी आहे.

# माणगावात जुगार अड्ड्यावर धाड

### ३२ जणांवर कारवाई; ७६ लाखांचा मुद्देमाल जप्त

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

माणगाव शहरातील एका इमारतीमध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी गुरुवारी (दि.१०) पहाटेच्या सुमारास धाड टाकली. या कारवाईत तब्बल ३२ जुगार खेळणाऱ्या व्यक्तींना ताब्यात घेण्यात आले असून ऑडी कारसह एकूण नऊ वाहने आणि २९ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहेत. जप्त मुद्देमालाची प्राथमिक किंमत सुमारे ७६ लाख रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

माणगाव शहरातील मुंबई-गोवा महामार्गालगत असलेल्या कार्तिक हॉटेलसमोरील नारायण शेट यांच्या मालकीच्या इमारतीमध्ये जुगाराचा धंदा होता. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने पहाटे सुमारे ३.३० वाजता संबंधित ठिकाणी छापा टाकला. पोलीस अचानक दाखल झाल्याने जुगार खेळणाऱ्यांची धावपळ उडाली.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी जुगार खेळणाऱ्या ३२ व्यक्तींना ताब्यात घेतले. घटनास्थळावरून एक ऑडी, दोन इर्टिगा, दोन मोटरसायकली आणि चार स्कूटी, अशी एकूण नऊ वाहने जप्त करण्यात आली आहेत. याशिवाय जुगारासाठी वापरले जात असलेले २९ मोबाईल फोनही पोलिसांनी जप्त केले आहेत.

जप्त करण्यात आलेल्या वाहनांसह इतर मुद्देमालाची एकूण प्राथमिक किंमत सुमारे ७५ लाख ८२ हजार २५ रुपये असल्याची माहिती समोर आली आहे. माणगाव शहराच्या मध्यवर्ती भागात सुरू असलेल्या या जुगार अड्ड्यावर झालेल्या मोठ्या कारवाईमुळे अवैध जुगार व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.



## निवडक

### दिवा-मुंब्रादरम्यान महिला लोकलमधून खाली पडली

**ठाणे :** डोंबिवलीहून मुंबईला चाललेल्या लोकलमधून एक महिला खाली पडल्याची घटना गुरुवारी (दि.१०) सकाळी दिवा-मुंब्रादरम्यान वळणावर घडली. सिग्नल लागला असल्याने ही लोकल थांबली होती. यावेळी गर्दीमुळे महिलेचा हात निसटला आणि ती रेल्वे रूळाशेजारी पडली. या महिलेला किरकोळ मार लागला आहे. सुदैवाने सिग्नल लागल्याने ती बचावली.

### एमपीएससी गट-क पूर्व परीक्षेच्या तारखेत बदल

**मुंबई :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) गट-क सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसंदर्भात महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २५ ऑक्टोबर रोजी होणारी ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली असून सुधारित वेळापत्रकानुसार आता ३ जानेवारी २०२७ रोजी राज्यातील सर्व जिल्हा केंद्रांवर घेतली जाईल.

## राज्यातील काही जिल्ह्यांना वादळी पावसासह विजांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई वेधशाळेने पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये वादळी वाऱ्यासह पाऊस आणि विजांच्या कडकडाटाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे.

११ सप्टेंबर रोजी नाशिक घाट, परभणी, हिंगोली, नांदेड, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

१२ सप्टेंबर रोजी धुळे, नाशिक घाट, नाशिक, पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, सोलापूर, लातूर, परभणी, नांदेड, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली या जिल्ह्यांमध्ये वादळी पाऊस व विजांची शक्यता आहे.

१३ सप्टेंबर रोजी पालघर, ठाणे, मुंबई, मुंबई उपनगर, रायगड, पुणे घाट, पुणे, सातारा घाट, सातारा, रत्नागिरी, नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, बुलढाणा, जालना, बीड, धाराशिव, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, अमरावती, यवतमाळ आणि वर्धा या जिल्ह्यांना यलो अलर्ट आहे.

१४ सप्टेंबर रोजी नाशिक घाट, पुणे घाट, पुणे, अहिल्यानगर आणि रत्नागिरी जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट आहे. अलर्ट असलेल्या जिल्ह्यांमध्ये नागरिकांनी विजांचा कडकडाट आणि वादळी वाऱ्याच्या वेळी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

## अबू सालेमची सुटका याचिका सुप्रीम कोर्टाने फेटाळली

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

१९९३च्या मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणातील दोषी आणि गँगस्टर अबू सालेम याला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा झटका मिळाला आहे. सालेमने केलेली सुटकेची मागणी करणारी याचिका न्यायालयाने फेटाळून लावली.

गँगस्टर अबू सालेमला २००५मध्ये पोर्तुगालमधून प्रत्यार्पणाद्वारे भारतात आणण्यात आले होते. तुरुंगातील चांगल्या आचरणामुळे आपली २५ वर्षांची शिक्षा पूर्ण झाल्याचा दावा सालेमने केला होता, मात्र सुप्रीम कोर्टाने बॉम्बे हायकोर्टाची गणनेची पद्धत योग्य ठरवत त्याची ही याचिका फेटाळली आहे.


## सिंधुदुर्गातील गणेशभक्तांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून विनामूल्य बससेवा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त कोकणातील आपल्या गावी जाणाऱ्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील गणेशभक्तांचा प्रवास सुखकर व आरामदायी व्हावा यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वतीने दोन विनामूल्य बससेवांचे आयोजन करण्यात आले आहे. या दोन्ही बस सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ, पनवेल-रायगड यांच्या माध्यमातून बुक करण्यात आल्या आहेत.

दोन्ही बस शनिवारी (दि. १२) सायंकाळी ४.४५ वाजता पनवेल येथून सिंधुदुर्गच्या दिशेने रवाना होणार असून यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभणार आहे.

बससेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी संघाचे सदस्य स्वाती ऑप्टिक्सचे मालक प्रल्हाद साटम आणि उपाध्यक्ष संतोष



चव्हाण यांनी विशेष प्रयत्न केले. त्याचप्रमाणे प्रदीप रावले, बाबाजी नेरुरकर आणि संघाचे सचिव रामचंद्र मोचेमाडकर यांनी पनवेल एसटी डेपोशी सातत्याने संपर्क साधून बस बुकिंगची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी मेहनत घेतली.

या उपक्रमाबद्दल बोलताना संघाचे अध्यक्ष केशव राणे यांनी सांगितले की, गणेशोत्सवानिमित्त सिंधुदुर्गातील गणेशभक्तांना आपल्या गावी जाण्यासाठी आरामदायी, सुरक्षित आणि सुखकर प्रवासाची सुविधा मिळावी या उद्देशाने आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी विनामूल्य बससेवा उपलब्ध करून दिली आहे. त्याबद्दल सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ आणि सिंधुदुर्गातील सर्व गणेशभक्तांच्या वतीने त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या प्रमाणावर नागरिक कोकणाकडे प्रवास करतात. अशा वेळी गणेशभक्तांना विनामूल्य बससेवेचा लाभ मिळणार असल्याने संघाच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

॥ श्री गणेशाय नमः ॥

रामप्रहर




तुमचा लाडका बाप्पा झळकणार 'दै. रामप्रहर'मध्ये!

गणेशोत्सवाच्या पावन पर्वावर दैनिक रामप्रहर घेऊन येत आहे सर्व गणेशभक्तांसाठी एक सुवर्णसंधी!
आपल्या लाडक्या बाप्पाचे मनमोहक रूप आता सगळ्यांना पाहूद्या...
१४ ते २५ सप्टेंबर या कालावधीत घरगुती आणि सार्वजनिक मंडळांच्या गणरायाचे फोटो 'रामप्रहर'मध्ये **विनामूल्य** प्रसिद्ध केले जाणार आहेत.

**बाप्पाचा फोटो इथे पाठवा**
ई-मेल आयडी : ramprahar@gmail.com
व्हॉट्सॲप क्रमांक : ७७३८१०६००९

**फोटोसोबत खालील माहिती नक्की पाठवा**
- घरगुती गणपती असल्यास : कुटुंबप्रमुखाचे नाव आणि संपूर्ण पत्ता
- सार्वजनिक गणपती असल्यास : मंडळाचे नाव आणि पत्ता

चला तर मग या गणेशोत्सवात तुमच्या बाप्पाचा सुंदर फोटो आणि माहिती आमच्यापर्यंत पोहोचवा आणि आपल्या बाप्पाचे रूप सर्वांपर्यंत घेऊन जा...
**दैनिक रामप्रहर : सदैव तुमच्या सोबत!**

# राजिपतर्फे आदर्श शिक्षकांचा सन्मान; शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा गौरव




**महाड : प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील गरीब आणि गरजू विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे महत्त्वपूर्ण काम शिक्षक करत असतात. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक नसून संपूर्ण गावाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका बजावणारा घटक आहे. त्यामुळे शिक्षकांवर मोठी सामाजिक जबाबदारी असल्याचे प्रतिपादन पालकमंत्री भरत गोगावले यांनी केले.

रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाच्या वतीने जिल्ह्यातील आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण तसेच शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांच्या गुणगौरवाचा कार्यक्रम गुरुवारी महाड येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय स्मारकात आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मार्गदर्शन करताना श्री.गोगावले बोलत होते.

कार्यक्रमास आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षण व अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे, महिला व बालकल्याण सभापती रसिका केणी, शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्यासह जिल्हा परिषदेचे विविध विषय समित्यांचे सभापती, सदस्य आणि अधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना पालमंत्री गोगावले म्हणाले, सध्या समाज माध्यमांवर ८०च्या दशकातील छायाचित्ररुपी आठवणी जपण्यापेक्षा त्या काळातील जिल्हा परिषद शाळांची गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची संख्या पुन्हा वाढविण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. खासगी शाळांकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना जिल्हा परिषद शाळांकडे आकर्षित करण्यासाठी शिक्षकांसह सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात शिक्षण व अर्थ सभापती चंद्रकांत कळंबे यांनी जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक उपक्रमांची माहिती दिली. जिल्ह्यातील उद्योगांनी आपल्या सीएसआर निधीचा उपयोग जिल्हा परिषद शाळांच्या विकासासाठी करावा, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर आणि उपाध्यक्ष मधुकर पाटील यांच्यासह अन्य मान्यवरांनी यावेळी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमात जिल्हा परिषदेच्या अभ्यास दिनदर्शिकेचे तसेच शिष्यवृत्ती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले. पालकमंत्री श्री. गोगावले आणि उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रायगड जिल्हा परिषदेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झालेल्या १६ शिक्षकांचा सन्मान करण्यात आला. त्याचबरोबर शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांचाही यावेळी गौरव करण्यात आला.

# महाडमध्ये १९.२३ लाखांचा प्रतिबंधित पानमसाला, सुगंधी तंबाखू साठा जप्त

**महाड : प्रतिनिधी**



प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि सुगंधी तंबाखूची विक्री व साठवणूक करणाऱ्याविरोधात महाड शहर पोलिसांनी गुरुवारी पहाटे धडक कारवाई केली आहे. गांधारीनाका परिसर आणि डोंगरी पूल येथील व्यापारी गाळ्यावर छापा टाकत पोलिसांनी तब्बल १५ लाख २३ हजार २९६ रुपयांचा प्रतिबंधित पानमसाला व सुगंधी तंबाखूचा साठा जप्त केला, तसेच या साठ्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेला चार लाख रुपये किमतीचा महिंद्रा मॅक्सिमो टेम्पोही पोलिसांनी ताब्यात घेतला असून साठा आणि वाहन मिळून १९ लाख २३ हजार २९६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी समीर वसंत पारेख (सरेकर आळी, महाड) याच्याविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या १३ जुलै २०२६ रोजीच्या अधिसूचनेनुसार राज्यात गुटखा, पानमसाला आणि सुगंधी तंबाखूची विक्री तसेच साठवणुकीवर पूर्ण बंदी आहे. असे असतानाही पारेख याने विक्रीच्या उद्देशाने प्रतिबंधित मालाचा साठा करून ठेवल्याचे कारवाईत समोर आले. अन्न सुरक्षा अधिकारी स्वालीहा मुलाणी यांच्या फिर्यादीवरून १० सप्टेंबर रोजी पहाटे ४.२८ वाजता गुन्ह्याची नोंद करण्यात आली.

पोलिसांनी यासाठी वापरण्यात आलेल्या महिंद्रा मॅक्सिमो टेम्पोची तपासणी केली, त्याचप्रमाणे डोंगरी पूल येथील मध्यमा ट्रायसिटी इमारतीच्या 'बी' विंगमधील गाळा क्रमांक ११ येथे झाडाझडती घेतली. या कारवाईत विमल पानमसाला, व्ही-१ सुगंधी तंबाखू आणि आर.एम.डी. प्रीमियम पानमसाला यांची विविध वजनांची हजारो पाकिटे पोलिसांच्या हाती लागली. जप्त करण्यात आलेल्या काही पाकिटांवर 'महाराष्ट्रात विक्रीसाठी नाही' असा स्पष्ट उल्लेख असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. त्यामुळे प्रतिबंधित पदार्थांच्या साठवणुकीसह त्यांच्या विक्रीसाठी सुरू असलेल्या व्यवहाराचा पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी प्रदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक एकशिंगे यांच्या देखरेखीखाली ही कारवाई करण्यात आली. महाड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक नाईक या पुढील तपास करीत आहेत.

# आमदार प्रशांत ठाकूर यांनी सोपान जांबेकर यांच्या कुटुंबीयांची घेतली सांत्वनपर भेट

**नागोठणे : बातमीदार**



भारतीय जनता पक्षाचे रायगड जिल्हा उपाध्यक्ष सोपानभाऊ जांबेकर यांच्या मातोश्री कविता जांबेकर यांचे बुधवार, दि. २ सप्टेंबर रोजी सायंकाळी दुःखद निधन झाले. या दुःखद प्रसंगी भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी नागोठणे जवळील आमडोशी येथील जांबेकर यांच्या निवासस्थानी भेट देऊन सोपानभाऊ जांबेकर व जांबेकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.

यावेळी आमदार प्रशांतदादा ठाकूर यांनी जांबेकर कुटुंबीयांची आस्थेने विचारपूस करून त्यांना धीर दिला. दुःखाच्या या प्रसंगी जांबेकर कुटुंबीयांच्या पाठीशी आपण ठामपणे उभे असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासमवेत भाजप नागोठणे शहराध्यक्ष गणेश घाग, विभागीय अध्यक्ष ज्ञानेश्वर शिर्के, शिक्षण सेल रोहा तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, प्रमोद जांबेकर, निवृत्ती जांबेकर, हरिश्चन्द्र जांबेकर, सुबोध गोळे, सुधीर जांबेकर, जांबेकर कुटुंबीय तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# माणगावसाठी स्वतंत्र वीज उपकेंद्राचा प्रस्ताव; वारंवार पुरवठा खंडित होण्याच्या समस्येला लागणार लगाम!

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहर आणि तालुक्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे होणाऱ्या त्रासातून आता मोठा दिलासा मिळण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. रायगडचे खासदार सुनील तटकरे यांनी माणगावसाठी स्वतंत्र वीज उपकेंद्र (स्विचिंग सेंटर) सुरू करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे शहरासह ग्रामीण भागातील वीजपुरवठा अधिक सक्षम आणि स्थिर होण्यास मदत होणार आहे.

माणगाव शहराची झपाट्याने वाढणारी लोकवस्ती, ग्रामीण भागातील वाढता वीजवापर आणि तालुक्याचा डोंगराळ व विस्तीर्ण भौगोलिक परिसर यामुळे विद्यमान वीज यंत्रणेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. परिणामी गेल्या काही काळात वीजपुरवठा वारंवार खंडित होणे, कमी-जास्त दाबाचा त्रास आणि बिघाड झाल्यानंतर वीज पूर्ववत होण्यास लागणारा वेळ यामुळे नागरिक, व्यापारी, शेतकरी तसेच लघुउद्योजक त्रस्त झाले होते.

गणेशोत्सवासारख्या महत्त्वाच्या सणांच्या काळातही वीजपुरवठ्याचा लपंडाव सुरू राहिल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढली होती. घरगुती ग्राहकांपासून दुकानदार, कार्यालये, उद्योग-व्यवसाय आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांपर्यंत सर्वांनाच त्याचा फटका बसत होता.

माणगाव आणि ग्रामीण भागासाठी स्वतंत्र वीज उपकेंद्र नसल्याने विद्यमान यंत्रणेवर मोठ्या प्रमाणात अवलंबून राहावे लागत होते. कांदळगाव येथील वीज केंद्रात बिघाड झाल्यास त्याचा थेट परिणाम माणगाव शहर आणि ग्रामीण भागातील वीजपुरवठ्यावर होत होता. बिघाड दुरुस्त होईपर्यंत अनेक भाग अंधारात राहत असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत होते.

स्वतंत्र वीज उपकेंद्र उभारण्यासाठी माणगावजवळील होडगाव येथील दोन एकर शासकीय भूखंड वीज वितरण कंपनीला हस्तांतरित करण्याचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे उपकेंद्र उभारणीच्या दृष्टीने महत्त्वाचा अडथळा दूर झाला असून, प्रत्यक्ष कामाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.

## पान १ वरुन

### महाराष्ट्राचा 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'

मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्त्रोतांचे होणारे नुकसान टाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद हा मूर्तीच्या आकारावर नव्हे, तर आपण पर्यावरण आणि समाजाची किती निस्वार्थ सेवा करतो यावर ठरतो.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या परीक्षकांनी निकाल जाहीर करताच मुख्यमंत्र्यांनी या यशाचे खरे शिलेदार सहभागी विद्यार्थी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले तसेच पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, पर्यावरण विभाग, जे.जे. स्कूल ऑफ आर्ट आणि कला संचालनालयाच्या प्रयत्नांची विशेष प्रशंसा केली.

पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना सांगितले की, शाडू मातीपासून बाप्पा घडवणाऱ्या या हजारो विद्यार्थ्यांनी स्वतःला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सिद्ध केले आहे. संस्कृती जपत पर्यावरण रक्षणाचा हा संदेश घराघरात पोहचविणे हाच या उपक्रमाचा मूळ हेतू आहे.

यावेळी ढोल-ताशांच्या मंगल गजरात आणि मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः शाडू माती हातात घेऊन गणेशमूर्ती साकारली. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाला आपल्यासोबत मूर्ती घडवताना पाहून विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहचला. आपण स्वतः करू शकतो, तर प्रत्येक कुटुंबही पर्यावरणपूरक बाप्पा साकारू शकते, असा ठाम आणि प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश या उपक्रमाने संपूर्ण समाजाला दिला.

शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, कला क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि हजारो गणेशभक्तांच्या साक्षीने हा जागतिक विक्रम आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर अत्यंत दिमाखात झाला.

### अफवांच्या पिकाला सत्याच्या विचारांनी छेद द्या; सोशल मीडियावर सक्रिय अन् बोलके राहा!

यावेळी प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी भाजपच्या संघटनात्मक सामर्थ्यावर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, भाजपची ताकद आणि क्षमता मोठी आहे. तब्बल १४ कोटी प्राथमिक सदस्य असलेला तसेच देशात सर्वाधिक लोकप्रतिनिधी असलेला पक्ष म्हणून भाजपची संघटनात्मक व्याप्ती व्यापक आहे. या भक्कम संघटनेच्या माध्यमातून केंद्र व राज्य सरकारच्या विकासकामांची माहिती जनतेपर्यंत पोहचविण्याबरोबरच पक्षाची विचारधारा आणि भूमिका प्रभावीपणे समाजासमोर मांडणे आवश्यक आहे. आज माहितीचा वेग प्रचंड वाढला आहे. एखादी चुकीची माहिती काही क्षणांत हजारो-लाखो लोकांपर्यंत पोहचू शकते. त्यामुळे विरोधकांकडून पसरवल्या जाणाऱ्या अफवा आणि अपप्रचाराला वेळीच उत्तर देणे गरजेचे आहे.



भाजपचा कार्यकर्ता हा केवळ पक्षाचा पदाधिकारी किंवा निवडणुकीपुरता कार्यकर्ता नसून तो समाजाशी सातत्याने संवाद साधणारा पक्षाचा प्रतिनिधी आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यकर्त्याने आपल्या परिसरातील नागरिकांशी संवाद वाढवावा आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून सत्य परिस्थिती जनतेसमोर मांडावी, असे आवाहन त्यांनी केले. पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मन की बात'मधून देशाची पुढील पिढी सुदृढ आणि सक्षम घडवायची असेल, तर भारत नशामुक्त करणे अत्यंत गरजेचे असल्याचे स्पष्ट केले आहे. अमली पदार्थांच्या विळख्यात एखाद्या कुटुंबातील व्यक्ती सापडली, तर त्या संपूर्ण कुटुंबावर कोणता भयावह प्रसंग ओढवू शकतो याची कल्पनाही मन हेलावून टाकणारी आहे. केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी काही मंडळी तरुण पिढीला अमली पदार्थांच्या आहारी लावून त्यांच्या आयुष्याला अक्षरशः मृत्यूच्या खाईकडे ढकलण्याचे काम करीत आहेत. त्यामुळे अशा समाजकंटकांचा सुगावा घेऊन त्यांची माहिती पोलीस प्रशासनापर्यंत पोहचविणे आणि नशेच्या या विळख्याविरोधात सामूहिकपणे लढा उभारणे ही प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे, असे ते म्हणाले.

नशामुक्त भारताच्या या व्यापक अभियानात उत्तर रायगड जिल्हा युवा मोर्चाने पुढाकार घेतला असून त्यांच्या या सामाजिक बांधिलकीचे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी मनापासून अभिनंदन केले. तरुणाईला व्यसनमुक्त, सक्षम आणि उज्ज्वल भविष्याच्या दिशेने घेऊन जाण्यासाठी युवा मोर्चाने उचललेले हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी असल्याचेही त्यांनी नमूद केले. युवा मोर्चाच्या माध्यमातून अंमली पदार्थांविरोधात रायगड जिल्हा युवा मोर्चाच्या माध्यमातून चळवळ उभी करण्यात आली असून या संकल्पाचा प्रोमो आणि युवा वॉरिअर्स टी-शर्टचे अनावरण प्रदेशाध्यक्षांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी सर्वांना नशामुक्त भारत संकल्पाची शपथ दिली.



प्रदेश सरचिटणीस आमदार निरंजन डावखरे यांनी एसआयआरच्या संदर्भातील प्रक्रिया व त्याबाबतची भूमिका स्पष्ट केली. प्रदेश सरचिटणीस आमदार योगेश सागर यांनी सेवा संकल्प अभियान या उपक्रमाची सविस्तर माहिती देत पक्षाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध सेवा उपक्रमांचा आढावा घेतला. जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांनी नुकत्याच निधन झालेल्या व्यक्तींच्या स्मृतिप्रीत्यर्थ शोकप्रस्ताव मांडला. यावेळी उपस्थितांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून दिवंगतांना श्रद्धांजली अर्पण केली.

भाजपचे प्रदेश चिटणीस आमदार प्रशांत ठाकूर यांनी राजकीय अभिनंदन प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला आमदार महेश बालदी यांनी अनुमोदन दिले तसेच विकसित भारताच्या संकल्पनेला बळ देणाऱ्या केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासाभिमुख निर्णयांचे अभिनंदन करणारा ठराव जिल्हा सरचिटणीस व पनवेल महापालिकेचे सभागृहनेते ॲड. प्रकाश बिनेदार यांनी मांडला. या ठरावाला जिल्हा सरचिटणीस तथा महापौर नितीन पाटील यांनी अनुमोदन दिले. जिल्हा बैठकीला उपस्थित राहून मार्गदर्शन केल्याबद्दल प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी आभार मानले.

आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची धुरा स्वीकारल्यानंतर पायाभूत सुविधा, उद्योग, शेती, शिक्षण, आरोग्य तसेच विविध विकास क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. विकसित भारताच्या दिशेने देशाने महत्त्वपूर्ण टप्पे गाठले असून केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना, प्रकल्प आणि विकासात्मक संकल्पांमुळे सर्वसामान्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडत असल्याचे आहेत.

देशाच्या विकासाला गती देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी, महाराष्ट्राच्या विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच केंद्र व राज्य सरकारच्या विविध विकासाभिमुख उपक्रमांचे अभिनंदन करणाऱ्या आमदार प्रशांत ठाकूर यांनी मांडलेल्या ठरावाला अनुमोदन देताना आमदार महेश बालदी यांनी राजकीय स्वार्थासाठी विरोधकांकडून समाजात संभ्रम निर्माण करण्याचे आणि जनतेची दिशाभूल करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. अशा प्रकारच्या षडयंत्रांना कार्यकर्त्यांनी ठामपणे आणि प्रभावीपणे उत्तर दिले पाहिजे, असे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

दरम्यान, प्रारंभी उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रास्ताविक केले. प्रदेशाकडून देण्यात आलेले विविध कार्यक्रम जिल्ह्यात यशस्वीपणे राबविले जात असून संघटनात्मक कामालाही मोठ्या प्रमाणात गती देण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबरदरम्यान सेवा संकल्प अभियान राबविण्यात येणार असून या अभियानाच्या माध्यमातून विविध सामाजिक आणि सेवाभावी उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्याचा संकल्प करण्यात आला आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहचून सेवा, संवाद आणि संघटन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून भाजपचे कार्य अधिक व्यापक करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या बैठकीला प्रदेश उपाध्यक्ष अतुल काळसेकर, ज्येष्ठ नेते माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कोकण म्हाडाचे माजी सभापती बाळासाहेब पाटील, पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, माजी सभागृहनेते व नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, दीपक बेहेरे, खालापूर पंचायत समिती सभापती कृष्णा पारंगे, पनवेल महापालिकेचे स्थायी समिती सभापती बबन मुकादम, महिला व बाल कल्याण सभापती ममता म्हात्रे, उरण उपनगराध्यक्ष रवी भोईर, खोपोली उपनगराध्यक्ष विक्रम साबळे, ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष प्रिया मुकादम, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, अल्पसंख्याक मोर्चाचे सरचिटणीस सय्यद अकबर, ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश भगत, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, संतोष शेलार, किसान मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सागर सांगडे यांच्यासह जिल्हा पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, मंडळ अध्यक्ष, विविध आघाड्यांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभेत विविध विषयांना मंजुरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा आज दिनांक १० सप्टेंबर रोजी महापालिका मुख्यालयात स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी विविध विषयांना मंजूरी देण्यात आली.



यावेळी स्थायी समितीचे सर्व सदस्य,अतिरीक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, उपायुक्त स्वरूप खारगे, उपसचिव अक्षय कदम ,महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पनवेल महानगरपालिके करिता महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ यांच्या कडून कंत्राटी पध्दतीने घेतलेल्या ७३ सुरक्षा कर्मचारी यांस ११ महिने कालावधी करीता मुदतवाढ. महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.३ ऐ, सेक्टर-२६ कामोठे येथे १५ एम.एल.डी. क्षमतेचे नविन मलउदंचन केंद्र (SPH) बांधणे व पुढील ५ वर्षाकरीता सदर केंद्राचे परिचलन, निगा, दुरुस्ती करणेबाबत. (२nd call) या कामी न्युनतम दराची निविदा मंजुर करण्याचा विषय स्थायी समितीने मंजूर केला.

पनवेल महानगरपालिका अंतर्गत क्षेत्रामध्ये ३ वर्षाकरीता पिण्याच्या पाण्याचे टँकर भाड्याने पुरविणेच्या कामांच्या वाढीव खर्चास मान्यता. प्रभाग समिती ब, कळंबोली मधील श्रीराम मंदिरापासून ते श्री अपार्टमेंट, प्लॉट नं. ०५, सेक्टर- ०१ पर्यंत रस्त्याचे काँक्रिटीकरण करणे व गटाराचे बांधकाम करणे ,प्रभाग समिती 'अ' 'ब' 'क' व 'ड' क्षेत्रातील अंतर्गत येणाऱ्या विविध ठिकाणच्या उद्यानामध्ये डेकोरेटिव्ह पथदिप खांब उभारुन कार्यान्वित करण्याला मंजूरी देण्यात आली.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग समिती "अ" "ब" "क" आणि "ड" मधील विविध ठिकाणी दोन वर्षाकरीता पावसाळी पाण्याचा उपसा करण्यासाठी भाडेतत्वावर पंपाचा पुरवठा करुन परिचलन करणे (२nd Call ) या कामी न्युनतम दराची निविदा मंजुर करणेबाबतचा विषय स्थायी समितीने मंजूर केला.

गणेशोत्सवाच्या अनुषंगाने गणेश विसर्जन घाटांवर नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे अत्यावश्यक असल्याने तसेच सदर ठिकाणी होणारी गर्दी, वाहतूक व नागरिकांच्या सुरक्षिततेच्या अनुषंगाने अनुचित घटना घडू नयेत तसेच आवश्यकतेनुसार घटनांचे निरीक्षण व नियंत्रण करणे सुलभ व्हावे,

यासाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करणे गरजेचे असल्याने याचवेळी स्थायी समितीची विशेष सभा घेण्यात आली.

## वर्षभरापासून शाळकरी मुलीचा पाठलाग; तरुणाला अटक

**पनवेल : वार्ताहर**

शाळकरी मुलीचा गेल्या वर्षभरापासून पाठलाग करून मोबाईलवरून त्रास देणाऱ्या २८ वर्षीय तरुणाला खांदेश्वर पोलिसांनी अटक केली आहे. शाळेत जात असताना मुलीला रस्त्यात अडवून कानाखाली मारल्यानंतर तिचा रिक्षातून पाठलाग केल्याचा प्रकार मंगळवारी उघडकीस आला. या प्रकरणी मुलीच्या पालकांच्या तक्रारीवरून पोलिसांनी बालकांचे लैंगिक अपराधांपासून संरक्षण (पोक्सो) कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे.

उमेश प्रगणे असे अटक करण्यात आलेल्या संशयित आरोपीचे नाव असून तो सुकापूर येथील भगतवाडी परिसरात राहतो. पोलिसांच्या माहितीनुसार, ऑगस्ट २०२५ पासून उमेशने इंस्टाग्रामच्या माध्यमातून शाळकरी मुलीशी संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरू केला. मुलीने प्रतिसाद न दिल्याने त्याने तिचा पाठलाग करणे तसेच तिचे छायाचित्र काढण्यास सुरुवात केली. त्यामुळे मुलीने त्याला इंस्टाग्रामवर अवरोधित केले.यानंतरही उमेशने मुलीच्या व्हॉट्सअॅप क्रमांकावर संदेश पाठवून त्रास देणे सुरूच ठेवले.

मंगळवारी मुलगी शाळेत जात असताना सुकापूर येथून गोकुळधाम सोसायटीसमोरील तपोवन रिक्षा थांब्यावर उमेशने तिला अडवले. मुलीने त्याच्याशी बोलण्यास नकार दिल्याने त्याने तिच्या कानाखाली मारली. त्यानंतर मुलगी रिक्षातून पुढे जात असतानाही त्याने रिक्षातून तिचा पाठलाग केला.

या प्रकारामुळे घाबरलेल्या मुलीच्या पालकांनी तातडीने खांदेश्वर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस निरीक्षक पी. जी. घागरे यांच्या पथकाने तत्काळ कारवाई करत उमेशला ताब्यात घेतले.

# गणेश मंडळे-शांतता समिती सदस्यांची बैठक




## सर्वांनी शिस्तीचे पालन करावे -आमदार प्रशांत ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उत्सवाचा आनंद सर्वांना घेता यावा यासाठी आपण सर्वांनी योग्य ती काळजी घेतली पाहिजे आणि आपली जबाबदारी समजून सर्वांनी शिस्तीचे पालन केले पाहिजे. वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जिथे पार्किंगची अधिकृत जागा नाही, तिथे कोणालाही वाहन पार्किंग करू देऊ नका, अशा सूचना आमदार प्रशांत ठाकूर यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाचा पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत दिल्या.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या अंतर्गत पनवेल परिमंडळाच्या वतीने सार्वजनिक गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेश मंडळे आणि शांतता समिती सदस्यांची महत्त्वपूर्ण बैठक खांदा कॉलनीतील श्री कृपा हॉलमध्ये पार पडली.

या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासह पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, सभागृहनेते प्रकाश बिनेदार, प्रभाग समिती सभापती अजय बहिरा, नगरसेवक सुमित झुंजारराव, दशरथ म्हात्रे, प्रथमेश सोमण, नगरसेविका दर्शना भोईर, सीताताई पाटील, अस्मिता घरत, शिवानी घरत, जिल्हा परिषद सदस्य कमला देशेकर, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, सहाय्यक पोलीस आयुक्त मयूर भुजबळ, विक्रम कदम यांच्यासह लोकप्रतिनिधी, पोलीस अधिकारी, शासकीय विभागांचे अधिकारी आणि गणेशोत्सव मंडळांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आगामी उत्सवाच्या काळात गणपती बाप्पाच्या आगमनाच्या व विसर्जनाच्या दृष्टीने एक सुजाण आणि दक्ष नागरिक म्हणून सर्वांनी काय खबरदारी घ्यायला हवी, कोणत्या जबाबदाऱ्या पार पाडायला हव्या आणि कोणकोणत्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले पाहिजे याविषयी मार्गदर्शन करण्यासाठी या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. बैठकीदरम्यान सुरक्षा व्यवस्था, वाहतूक नियोजन आणि शांतता व सुव्यवस्था राखण्यासंदर्भात विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

## पनवेल महापालिकेतर्फे ४३ ठिकाणी आरोग्य शिबिरे; फणसवाडीत उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महापौर नितीन पाटील यांच्या सूचनेनुसार पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनीा त्यांच्या परिसरातच दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे लोककल्याणकारी योजनेअंतर्गत आरोग्य तपासणी शिबिरांना सुरुवात झाली आहे. फणसवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत आज आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन प्रभाग समिती 'ब'चे सभापती मधु पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य तपासणीचा लाभ घेतला.



आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आलेल्या या आरोग्य तपासणी शिबिरास मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ आनंद गोसावी, क्षयरोग अधिकारी डॉ उषा राठोड, माता बाल संगोपन अधिकारी डॉ.गणेश नायर, वैद्यकीय अधिकारी डॉ सुरेश पंडित, वैद्यकीय अधिकारी डॉ भक्तराज भोईटे, महापालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिका क्षेत्रातील चारही प्रभागांमध्ये सुमारे ४३ ठिकाणी ही शिबिरे आयोजित करण्यात आली असून, विविध वैद्यकीय शाखांतील तज्ज्ञ डॉक्टर नागरिकांची तपासणी करणार आहेत.

दिनांक १० सप्टेंबर ते २ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात येणाऱ्या या शिबिरांमध्ये स्त्रीरोग व प्रसूतिशास्त्र, कान-नाक-घसा, भिषक, नेत्ररोग, अस्थिरोग, मानसोपचार, बालरोग आणि त्वचारोग या विभागांतील तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महापालिका क्षेत्रातील विशेषतः ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेत आरोग्य तपासणी आणि तज्ज्ञ वैद्यकीय सल्ला मिळावा, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. शिबिरांमध्ये नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करून आवश्यकतेनुसार पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन करण्यात येत आहे.

पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांनी आपल्या परिसरात आयोजित करण्यात येणाऱ्या आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा आणि वेळेत आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात 'युवा संसद २०२६'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात दिनांक ७ सप्टेंबर २०२६ या दिवशी युवा संसद (E०३) युवा संसद २०२६याचे आयोजन करण्यात आले होते . भारत सरकारच्या युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्रालयाच्या सहकार्याने, इन्फिनिटी फाउंडेशनच्या 'युवा नीती' या उपक्रमांतर्गत युवा संसद (E०३) युवा संसद २०२६ या विशेष उपक्रमाचे आयोजन रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर येथे करण्यात आले.



या उपक्रमामध्ये विद्यालयीन विद्यार्थ्यांना भारतीय संसदेच्या कार्यपद्धतीचा अनुभव देण्यात आला. लोकशाही संवाद, विविध सार्वजनिक धोरणांवरील चर्चा, वादविवाद तसेच राष्ट्रनिर्मितीशी संबंधित विषयांवर विद्यार्थ्यांनी आपली मते प्रभावीपणे मांडली. या युवा संसदेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, चिकित्सक विचारशक्ती, निर्णयक्षमता आणि प्रभावी वक्तृत्व कौशल्य विकसित करण्यास मदत झाली. तसेच संसदीय कार्यपद्धती, लोकशाही शासनव्यवस्था आणि जबाबदार नागरिक म्हणून युवकांची भूमिका याबाबत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्यात आली. या उपक्रमाचा मुख्य उद्देश युवकांना संसदीय कार्यपद्धतीची ओळख करून देणे, त्यांच्यामध्ये नेतृत्व आणि निर्णयक्षमता विकसित करणे तसेच सक्रिय नागरी सहभाग व जबाबदार नागरिकत्वाची भावना रुजविणे हा होता. "विद्यार्थ्यांपासून संसद सदस्यापर्यंत उद्याच्या नेत्यांना घडविण्याचा संकल्प" हे या उपक्रमाचे प्रेरणावाक्य असून, इन्फिनिटी फाउंडेशनच्या 'युवा नीती' या उपक्रमाद्वारे युवकांना शासनव्यवस्था, सार्वजनिक धोरणे आणि राष्ट्रहिताशी संबंधित विविध विषयांवर चर्चा करण्यासाठी एक प्रभावी व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना लोकशाही मूल्ये, संसदीय प्रक्रिया आणि राष्ट्रनिर्मितीतील युवकांची महत्त्वपूर्ण भूमिका समजून घेण्याची प्रेरणादायी संधी मिळाली.

## कंटेनरच्या धडकेत टेम्पोचालकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

गोव्याच्या दिशेने पनवेलकडे येणाऱ्या रस्त्यावर श्री बालाजी हॉटेलसमोर कंटेनरने धडक दिल्याने टेम्पोचालकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली. या प्रकरणी कंटेनरचालकाविरुद्ध पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कंटेनर क्रमांक एमएच-०४ एचवाय-५३३० हा चालकाच्या ताब्यात होता. संबंधित कंटेनर चालकाने रस्त्याच्या डाव्या बाजूला धोकादायक पद्धतीने वाहन वळविताना कोणताही इंडिकेटर न लावल्याचा आरोप आहे. त्याचवेळी मागून येणाऱ्या एमएच-४६ बीएफ-९९४४ क्रमांकाच्या टेम्पोला कंटेनरची धडक बसली.या अपघातात टेम्पोचालक दशरथ बाबुराव मुंडे (वय ४६) यांना गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## बलात्कारप्रकरणी गुन्हा दाखल

**नवीन पनवेल :** विधवा महिलेला लग्नाचे आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध करून लग्नास नकार दिल्याप्रकरणी ४८ वर्षीय आरोपी विरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात ९ सप्टेंबर रोजी बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात आला. ४८ वर्षीय आरोपी याने विधवा महिलेला छोटा खांदा येथील रूमवर आणि वाकडी येथील घरी नेऊन तिला लग्नाचे आमिष दाखवले आणि तिच्यावर अत्याचार केला व लग्न करण्यास नकार दिला. या प्रकरणी तक्रार दिल्यानंतर पोलिसांनी आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला.

## सीकेटी विद्यालयात शिक्षक दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) माध्यमिक विदयालयाच्या मराठी माध्यम विभागामध्ये शुक्रवारी (दि.४) व गुरुवार (दि.१०) शिक्षक दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयाचे प्राचार्य कैलास म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले.



भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन शिक्षक दिन म्हणून साजरा करताना विदयालयाचे प्राचार्य कैलास म्हात्रे यांच्या शुभहस्ते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ज.भ.शि.प्र. संस्थेच्या चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयाचे प्राचार्य कैलास म्हात्रे, पर्यवेक्षक. हरिश्चंद्र ठाकूर सभेचे अध्यक्ष जेष्ठ लिपिक हेमंत कोळी यांच्या हस्ते शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना भेटवस्तू देऊन गुणगौरव करण्यात आला.

आपल्या शिक्षकांविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस साजरा करताना, इयत्ता दहावीच्या सर्व विदयार्थ्यांनी शिक्षक बनून इयत्ता पाचवी ते नववीच्या सर्व विदयार्थ्यांनी अध्यापनाचे कार्य केले. त्यासाठी त्यांना इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक विदया मावलीकर, स्वाती पाटील, समिता पाटील यांचे मार्गदर्शन लाभले व 'विदयार्थी शिक्षकवृंद' यांनी पुढीलप्रमाणे कार्यभार सांभाळला. मुख्याध्यापिका सई सुबोध दिवेकर, पर्यवेक्षक रुद्र रुपेश परब, पर्यवेक्षक विहान संदीप जाधव तसेच सांस्कृतिक विदयार्थी मंडळातर्फे विदयालयातील सर्व शिक्षकांना विदयार्थ्यांनी स्वतः हाताने बनवलेली भेटकार्ड दिली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन सारिका दिवेकर यांनी केले.

## 'पनवेल स्टेशन रोडवरील गटार व रस्त्याचे काम तातडीने करा'



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील स्टेशन रोड परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या रस्ते व पावसाळी गटारांच्या समस्येकडे तातडीने लक्ष देण्याची मागणी नगरसेवक अॅड. मनोज भुजबळ यांनी केली आहे.

महापालिकेच्या यादीतील पनवेल येथील साईबाबा मंदिर ते हॉटेल आर्या, स्टेशन रोड तसेच संत सावता माळी हॉल ते मुख्य काँक्रिटी रस्ता या मार्गावरील दोन्ही बाजूंचे जुने पावसाळी गटार तोडून त्याठिकाणी नव्याने कौशल्यपूर्ण पद्धतीने गटार व फुटपाथ बांधण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.तसेच संबंधित मार्गावरील रस्त्याचे नव्याने काँक्रिटीकरण करून नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार वाहतूक सुविधा उपलब्ध करून द्यावी, पावसाळ्यात गटारे तुंबणे, पाणी साचणे तसेच खराब रस्त्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. परिसरातील समस्या कायमस्वरूपी सोडविण्याची मागणीा प्रशासनाकडे केली आहे.

## संपादकीय

# नियंत्रणाचा प्रश्न

एआयची क्षमता आज ज्या अफाट वेगाने वाढते आहे, त्या वेगामुळेच त्यातून उद्भवणाऱ्या संभाव्य धोक्यांबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत आणि हे प्रश्न विचारणारे कुणी तंत्रज्ञान क्षेत्राबाहेरचे, एआयला विरोध करणारे लोक नाहीत, तर आजवर ज्यांनी एआयचे तंत्रज्ञान विकसित करण्यात योगदान दिले अशी वरिष्ठ तज्ज्ञ मंडळीच त्यातून मानवतेला असलेल्या टोकाच्या धोक्याबद्दल इशारे देत आहेत.

**कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (एआय) ही आधुनिक जगातील आजवरची सर्वाधिक परिवर्तनकारी तंत्रज्ञानक्रांती आहे. आरोग्य, शिक्षण, उद्योग, संरक्षण, संशोधन अशा सर्वच क्षेत्रांमध्ये एआयने मानवी क्षमतांच्या कितीतरी पुढे जाऊन आपल्या कामगिरीचा विस्तार केला आहे. अँथ्रोपिक या आघाडीच्या एआय तंत्रज्ञान कंपनीमधील संशोधक जेकब कॉक्सन यांनी राजीनामा देताना जाहीर व्यक्त केलेल्या चिंतेकडे त्यामुळेच दुर्लक्ष करता येणार नाही. ओपनएआय आणि अँथ्रोपिक या दोन्ही आघाडीच्या कंपन्यांमध्ये एआय प्री-ट्रेनिंगवर काम केलेल्या कॉक्सन यांनी आरोप केला आहे की या आघाडीच्या कंपन्या 'सुपरइंटेलिजन्स'च्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहेत. मात्र अत्यंत शक्तिशाली एआय प्रणालीवर मानवी नियंत्रण कसे कायम ठेवायचे याचे समाधानकारक उत्तर मात्र त्यांच्याकडे नाही. कॉक्सन यांचे सहकारी, अँथ्रोपिकचे अलाइनमेंट संशोधक इव्हान ह्युबिंगर यांनीही एआय हा मानवजातीसाठी अस्तित्वाचा धोका ठरू शकतो ही शक्यता मान्य केली आहे. 'एआय २०३०पर्यंत मानवजातीचा नाश करणार' असा इशारा कॉक्सन यांनी दिला आहे. त्यांच्या या निष्कर्षातील कालमर्यादेबद्दल वाद असू शकेल. कारण सुपरइंटेलिजंट एआय नेमके कधी विकसित होईल, त्याची क्षमता किती असेल आणि त्यांचे मानवाकडून नियंत्रण करणे किती कठीण असेल याबाबत आजच निश्चितपणे बोलता येत नसले तरी या इशाऱ्यांकडे सावधगिरीची गरज म्हणून गांभीर्याने पाहणे आवश्यक आहे. एआयचा धोका केवळ एखादी यंत्रणा मानवाविरुद्ध बंड करेल असा व इतकाच नाही. त्या टोकापर्यंत जाण्याआधी सायबरहल्ले, फसवणूक, दिशाभूल करणारी माहिती, मानवी निर्णयप्रक्रियेत अतिरेकी स्वयंचलित हस्तक्षेप आणि या शक्तिशाली अत्याधुनिक तंत्रज्ञानाचे नियंत्रण काही मोजक्या कंपन्या किंवा सरकारांच्या हातात केंद्रित होणे हे अधिक जवळचे धोके आहेत. मानवाची एआयवर अवलंबून राहण्याची वाढती प्रवृत्तीही भविष्यात गंभीररित्या हानीकारक ठरू शकते. अर्थात तरीही एआयचा विकास रोखणे हा काही त्यावरील उपाय ठरत नाही. लक्ष दिले पाहिजे ते या क्षेत्रात आज सर्रास दिसणाऱ्या 'तंत्रज्ञान पुढे जाऊ दे, सुरक्षेचे नंतर पाहू' या गाफिल भूमिकेकडे. एआयच्या वाढत्या क्षमतेसोबतच मानवतेच्या हिताच्या दृष्टीने त्यासंदर्भातली सुरक्षा, पारदर्शकता, नैतिकता यासंबंधीचे संशोधनही तितक्याच वा अधिक वेगाने पुढे गेले पाहिजे. शक्तिशाली एआय प्रणालींच्या विकासासाठी स्पष्ट चाचण्या, मानवी देखरेख आणि जबाबदारीची चौकट आवश्यक आहे. भारताच्या दृष्टीनेही या चर्चेला विशेष महत्त्व आहे. एआयच्या शर्यतीत मागे राहणे भारताला परवडणारे नाही. प्रशासनापासून आरोग्य, शेती, शिक्षण आणि उद्योगापर्यंत एआयचा उपयोग करून विकासाला नवी गती देतानाच भारताने सुरक्षित आणि जबाबदार एआयच्या जागतिक नियमांच्या निर्मितीतही नेतृत्व करायला हवे. मानवाने निर्माण केलेली कृत्रिम बुद्धिमत्ता मानवाच्या नियंत्रणाबाहेर जाऊ नये हीच या प्रणालींची मूलभूत कसोटी आहे. एआयला घाबरून त्याचा विकास रोखणे जितके चुकीचे, तितकेच त्याच्या सामर्थ्याबद्दल बेफिकीर राहणेही धोकादायक आहे. गरज एआयच्या विकासाला थांबवण्याची नसून त्याला योग्य दिशेने नेण्याची आहे.**

# आयुष्मान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना

अचानक उद्‌भवणारे आजारपण केवळ शारीरिक त्रास घेऊन येत नाही, तर संपूर्ण कुटुंबाची आर्थिक घडी विस्कटून टाकते. गंभीर शस्त्रक्रिया, अतिदक्षता विभागातील उपचार आणि महागडी औषधे यामुळे अनेक कुटुंबे कर्जबाजारी होतात. मात्र, महाराष्ट्रातील जनतेला या आर्थिक संकटातून कायमचा दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने २८ जुलै २०२३च्या ऐतिहासिक निर्णयाद्‌वारे महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेची व्याप्ती वाढवली आणि १ जुलै २०२४ पासून ही एकात्मिक योजना संपूर्ण लोकसंख्येसाठी लागू केली. आज ही योजना दुर्धर व खर्चिक आजारांवर उपचारासाठी सामान्यांच्या आयुष्यातील खरी 'संजीवनी' ठरत आहे.

योजनेची व्याप्ती आणि वैशिष्ट्ये : सर्वांसाठी ५ लाखांचे विमा कवच ही योजना पूर्णपणे हमी तत्त्वावर राबविली जात असून द्वितीय आणि तृतीय प्रकारच्या गंभीर आजारांवर उपचार पुरवते.

प्रती कुटुंब रु. ५ लाखांचे संरक्षण : कुटुंबातील एका सदस्यासाठी किंवा संपूर्ण कुटुंबासाठी दरवर्षी ५ लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत उपलब्ध आहेत.

देशव्यापी लाभ : महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ राज्यातील कोणत्याही अंगीकृत शासकीय अथवा खाजगी रुग्णालयात मिळतो, तर प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेमुळे देशभरातील कोणत्याही राज्यातील अंगीकृत रुग्णालयात कॅशलेस उपचार घेता येतात.

पहिल्याच दिवसापासून संरक्षण : इतर विमा कंपन्यांप्रमाणे या योजनेत जुन्या आजारांसाठी 'वेटिंग पिरियड' नाही; योजनेतील सर्व ३४ विशेष सेवांतर्गत आजार पहिल्या दिवसापासून संरक्षित आहेत.

ज्येष्ठांसाठी 'वय वंदना' : ७० वर्षे व त्याहून अधिक वय असणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांसाठी योजनेंतर्गत अधिकचे रु. ५ लाख रुपयांचे स्वतंत्र विमा कवच दिले जात आहे, जे ज्येष्ठांच्या आरोग्यासाठी मोठे वरदान ठरले आहे.

### उपचार, औषधे ते प्रवासाचा खर्च; सर्वकाही निःशुल्क

अनेकदा रुग्णालयात केवळ बेडचा खर्च मिळतो आणि औषधे-तपासण्यांचा भुर्दंड रुग्णावर पडतो, मात्र या योजनेत पॅकेज पद्‌धतीमुळे रुग्णाला रुग्णालयात दाखल केल्यापासून घरी सुट्‌टी होईपर्यंत एकही रुपया द्यावा लागत नाही.

पॅकेजमध्ये समाविष्ट घटक : जनरल वॉर्ड, नर्सिंग शुल्क, तज्ज्ञ डॉक्टर व भूलतज्ज्ञांची फी, आयसीयू आणि ऑपरेशन थिएटर शुल्क, रक्त संक्रमण (Blood Transfusion), एक्स-रे व निदान चाचण्या, तसेच आंतररुग्णाला दिला जाणारा पौष्टिक आहार.

प्रवास खर्च व अंतिम संस्कार सहाय्य : रुग्णाला डिस्चार्ज मिळाल्यानंतर घरी जाण्यासाठी एसटी बस किंवा रेल्वे द्वितीय श्रेणीच्या दरानुसार प्रवास खर्च दिला जातो. दुर्दैवाने उपचारादरम्यान रुग्णाचा मृत्यू झाल्यास, मृतदेह रुग्णालयातून घरापर्यंत सन्मानाने नेण्याचा खर्चही याच योजनेच्या पॅकेजमधून केला जातो.

### लाखो रुपयांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया आता मोफत

या योजनेमध्ये सामान्य आजारांपासून ते अत्यंत खर्चिक व अत्याधुनिक शस्त्रक्रियांचा समावेश आहे. हृदयविकार : हार्ट अटॅकवरील उपचार, अँजिओप्लास्टी, बायपास सर्जरी, पेसमेकर बसवणे आणि लहान मुलांमधील जन्मजात हृदयरोगावरील शस्त्रक्रिया.

अवयव प्रत्यारोपण : सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर असणारे किडनी ट्रान्सप्लांट, लिव्हर ट्रान्सप्लांट आणि बोन मॅरो ट्रान्सप्लांट पूर्णपणे विनामूल्य.

कॅन्सर उपचार : शस्त्रक्रिया, केमोथेरपी व रेडिएशन थेरपी. इतर गंभीर आजार : मेंदू व स्पाईन शस्त्रक्रिया, डायलिसिस, मुतखडा, डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, हाडांच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रिया, जळीत रुग्ण, विषबाधा, सर्पदंश व नवजात बालकांचे अतिदक्षता उपचार.

आयुष्मान कार्ड कसे मिळवाल? योजनेचा लाभ घेण्यासाठी प्रत्येक कुटुंबातील सदस्याकडे आयुष्मान कार्ड असणे आवश्यक आहे. नजीकच्या अंगीकृत रुग्णालयातील आरोग्यमित्र, सेतू केंद्र, आशा सेविका किंवा ग्रामपंचायतीमधील संगणक परिचालक यांच्या मदतीने हे कार्ड मोफत काढता येते. नागरिक स्वतः गुगल प्ले स्टोअरवरून 'Ayushman App' डाउनलोड करून घरबसल्याही स्वतःचे कार्ड तयार करू शकतात.

आरोग्य हीच खरी संपत्ती आहे. संकट सांगून येत नाही. अशा वेळी उपचाराअभावी कोणावरही संकट कोसळू नये यासाठी शासनाने ही योजना सर्वसमावेशक केली आहे. आजच आपले 'आयुष्मान कार्ड' काढून घ्यावे आणि कुटुंबाला ५ लाखांचे भक्कम आरोग्य सुरक्षा कवच मिळवून द्यावे.


**-प्रशांत सातपुते,**
जिल्हा माहिती अधिकारी, रत्नागिरी

# सुप्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल

सुप्रसिद्ध कवी आत्माराम रावजी देशपांडे ऊर्फ अनिल यांचा जन्म ११ सप्टेंबर १९०१ रोजी मूर्तिजापूर येथे झाला. मुर्तिजापूर येथे शालेय शिक्षण पूर्ण केल्यावर १९१९ साली ते पुण्यात आले. फर्ग्युसन महाविद्यालयात कला शाखेचा अभ्यासक्रम करीत असताना त्यांचा कुसुम जयवंत या तरुणीशी परिचय झाला . त्याचे पुढे प्रेमात रुपांतर होऊन ६ ऑक्टोबर १९२९ रोजी त्याची परिणती विवाहात झाली. कुसुमावती देशपांडे यासुद्धा उत्तम लेखिका व समीक्षक होत्या.

कुसुमाभोवती रुंजी घालणारा वारा म्हणजे 'अनिल' म्हणून आत्माराम रावजी देशपांडे यांनी हे टोपणनाव घेतलं होतं. अनिल ब्राह्मण, तर कुसुम सीकेपी. १९२९ साली दोघांच्या आंतरजातीय विवाहाला प्रचंड विरोध झाला होता, पण लग्नानंतर दोघांचंही आयुष्य साहित्यिक आणि लौकिकार्थानं बहरत गेलं.

कवी अनिल दशपदी आणि मुक्तछंद या काव्यप्रकाराचे प्रवर्तक होते. मुक्तछंद हा काव्यप्रकार अनिलांनी मराठीत रुजवला. कविता मुक्तछंदात असली तरी त्यांनी कवितेचे व्याकरण आणि तालाचे भान त्यांनी कधी सोडले नाही. दहा चरणांची कविता दशपदी हा काव्यप्रकार त्यांनी सुरू केला. कवी अनिलांना इ.स. १९७९ची साहित्य अकादमीची फेलेशिप प्रदान करण्यात आली होती. १९५८ साली मालवण येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी



भूषवले होते, तर १९७७ साली 'दशपदी'साठी त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता.

कवी अनिल आणि कुसुमावती या सुविद्य दंपतीच्या पत्रव्यवहाराचा संग्रह प्रसिद्ध आहे. सुप्रसिद्ध नाटककार महेश एलकुंचवार यांच्या हस्ते या पत्रप्रपंचाचे पुनर्प्रकाशन नागपूर येथे दि.२ जुलै २०१७ रोजी झाले. इ.स.१९२२ ते १९२७ या काळातील ती पत्रं आहेत. पत्रातून माणूस जितका खरेपणाने कळतो तितका तो आत्मचरित्रातून किंवा चरित्रातूनही कळत नाही. चरित्रात अथवा आत्मचरित्रात फक्त भूतकाळ आपल्यासमोर चितारला जातो, पण पत्रातून भूतकाळ वर्तमानाची वस्त्र लेऊन आपल्या बरोबरीने चालत राहतो.

संस्कृतीच्या काठावर फुललेलं कुसुमानिल हे एक सुंदर झाड आहे. या झाडाची सावली येणाऱ्या पिढ्यांना मिळावी, या झाडवरच्या पक्षांची किलबिल, त्याला लगडलेल्या फुलांचा सुगंध आपल्या मुलांना आणि नातवंडाना मिळावा अशा तीव्र इच्छेतून मी कुसुमानिल पुनः प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. ही एलकुंचवारांची प्रस्तावना खूपच बोलकी आहे.

अजुनी रुसूनी आहे या अत्यंत तरल काव्याची जन्मकथा अशी सांगितली जाते, एका कार्यक्रमासाठी कवी अनिल गेले होते. परत आल्यावर घराचे दार वाजवले पण काहीच प्रतिसाद मिळाला नाही. अनिलांना वाटले आपली प्रिया रूसून बसली आहे, पण त्यांची अर्धांगिनी चिरनिद्रेत गेली होती. तिचा निष्प्राण देह बघून अनिल पूर्णपणे कोसळून गेले होते. तेव्हा मनाच्या उद्विग्न अवस्थेत अनिलांच्या लेखणीतून ही कविता उमटली. खरंतर ही कविता अनिलांनी कुसुमावती यांच्या निधनापूर्वी चौदा वर्षे आधी लिहिली होती. त्यामुळे या दाव्यात काही तथ्य असेल असे वाटत नाही! ही भावस्पर्शी कविता कुमार गंधर्वांनी आपल्या अमृततुल्य स्वरात गायली आणि अमर केली. (साभार इंटररनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### भारताची ५जीनंतर आता ६जीची तयारी सुरू

देशभरात ५G नेटवर्कचा विस्तार वेगाने सुरू असतानाच आता भारताने आता ६G तंत्रज्ञानाची तयारी सुरू केली आहे. भविष्यातील दूरसंचार तंत्रज्ञानाच्या विकासासाठी अमेरिकेच्या नेतृत्वाखाली उभारण्यात आलेल्या एका महत्त्वपूर्ण जागतिक आघाडीत भारताचा समावेश झाला आहे. या आघाडीत ६G तंत्रज्ञान विकसित करण्यासाठी काम करणाऱ्या इतर २४ देशांचाही सहभाग आहे.




अमेरिकेच्या वाणिज्य विभागाच्या माहितीनुसार अमेरिकेतील नॉर्थ कॅरोलिना येथील चॅपल हिल येथे झालेल्या G२० इनोव्हेशन मंत्रिस्तरीय बैठकीदरम्यान भारताच्या या आघाडीत सहभागी होण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले.

या बैठकीदरम्यान भारताचे केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री जितिन प्रसाद आणि अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लटनिक यांच्यात द्विपक्षीय चर्चा झाली. या चर्चेनंतर भारताचा ६G तंत्रज्ञानाच्या विकासासाठीच्या जागतिक गटात अधिकृत सहभाग निश्चित झाला. या जागतिक उपक्रमाचा उद्देश भविष्यातील दूरसंचार तंत्रज्ञानाच्या विकासाला चालना देणे, नवकल्पनांना प्रोत्साहन देणे आणि सहभागी देशांच्या सामायिक सुरक्षा हितांचे संरक्षण करणे हा आहे.

G२० इनोव्हेशन मंत्रिस्तरीय बैठकीत भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व जितिन प्रसाद यांनी केले. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (MeitY), विज्ञान आणि तंत्रज्ञान विभाग (DST) यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी या शिष्टमंडळात सहभागी झाले होते.

बैठकीच्या अखेरीस सहभागी देशांच्या मंत्र्यांनी संयुक्त निवेदन जारी केले. उदयोन्मुख तंत्रज्ञानामुळे जगभरातील नागरिकांसाठी विकासाच्या आणि प्रगतीच्या नव्या संधी निर्माण होऊ शकतात, असे या निवेदनात नमूद करण्यात आले.


६G हे केवळ ५Gपेक्षा अधिक वेगवान इंटरनेट देणारे तंत्रज्ञान नसेल, तर त्याचा वापर AI, रोबोटिक्स, ऑटोमेशन, स्मार्ट सिटी आणि इतर अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या विकासासाठी मोठ्या प्रमाणावर होण्याची अपेक्षा आहे. उच्च वेग, कमी विलंब आणि मोठ्या प्रमाणातील उपकरणांना जोडण्याची क्षमता यामुळे भविष्यातील डिजिटल सेवांना मोठी चालना मिळू शकते. त्याचबरोबर सायबर सुरक्षा आणि सुरक्षित डिजिटल पायाभूत सुविधांच्या विकासालाही महत्त्व मिळणार आहे.

# भूदान चळवळीचे प्रणेते विनोबा भावे

भूदान चळवळीचे प्रवर्तक आचार्य विनोबा भावे यांची आज जयंती. रायगड जिल्ह्याच्या पेण तालुक्यातील गागोदे या गावी विनोबा तथा विनायक नरहरी भावे यांचा जन्म झाला. त्यांच्या आजोबांचे नाव शंभुराव भावे. शंभुरावांचे जन्मगाव वाई. त्यांच्या अनेक पिढ्यांचे वास्तव्य वाई येथे होते. आजोबा आणि मातुश्रींपासून धर्मपरायनतेचे संस्कार विनोबांना मिळाले.

विनोबा भावे यांचे वडील नरहरी शंभुराव भावे व आई रूक्मिणीबाई हे नोकरीच्या निमित्ताने बडोदे येथे गेले. विनोबांचे माध्यमिक आणि उच्च शिक्षण बडोदे येथेच झाले. १९१६ साली महाविद्यालयीन इंटरची परीक्षा देण्यासाठी ते मुंबईस जाण्यास निघाले, परंतु वाटेतच सुरतेस उतरून आई-वडिलांना न कळविताच वाराणसी येथे रवाना झाले. त्यांना दोन गोष्टींचे आकर्षण होते. एक हिमालय व दुसरे बंगालचे सशस्त्र क्रांतिकारक. वाराणसी येथे हिंदू विश्वविद्यालयातील एका समारंभात महात्मा गांधीचे भाषण झाले. त्याचा त्यांच्या मनावर खोल परिणाम झाला.

हिमालयातील अध्यात्म आणि बंगालमधील क्रांती यांच्या दोन्ही प्रेरणा महात्मा गांधीच्या उक्तीत आणि व्यक्तिमत्त्वात त्यांना आढळल्या. महात्मा गांधींशी पत्रव्यवहार केला. महात्मा गांधींची कोचरब आश्रमात ७ जून १९१६ रोजा भेट घेतली आणि तेथेच त्या सत्याग्रहश्रमात



## निमित्त


नैष्ठिक ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा करून जीवनसाधना सुरू केली. ऑक्टोबर १९१६ रोजी महात्मा गांधींची एक वर्षांची रजा घेऊन ते वाई येथे प्राज्ञपाठशाळेत वेदान्ताच्या अध्ययनाकरिता उपस्थित झाले. ब्रह्मविद्येची साधना त्यांचा जीवनोद्देश होता.

१९३२ सालच्या सविनय कायदेभंगाच्या सामुदायिक आंदोलनात विनोबांनी भाग घेतला. त्यांनी धुळे कारागृहामध्ये शिक्षा भोगली. सुप्रसिद्ध गीताप्रवचने या कारागृहात त्यांनी दिली. शंभरापेक्षा अधिक सत्याग्रही कैदी आणि इतर गुन्ह्यांस्तव शिक्षा झालेले कैदी या प्रवचनांच्या रविवारच्या सभेत उपस्थित असत. त्यांमध्ये शेठ जमनालाल वजाज, गुलजारीलाल नंदा, अण्णासाहेब दास्ताने, साने गुरूजी इ. मंडळी उपस्थित असत.

वैयक्तिक सत्याग्रहानंतर ७ मार्च १९५१पर्यंत पवनार येथील परंधाम आश्रमातच विनोबांनी शारीरिक आणि मानसिक तपश्चर्येत जीवन व्यतीत केले. १९३६पासून महात्मा गांधी साबरमतीचा आश्रम सोडून सेवाग्रामला म्हणजे पवनारजवळच येऊन राहिले. त्यामुळे गांधी आणि विनोबा यांचा चिरकाल संवाद चालू राहिला. गांधीच्या देहान्तानंतर सर्वसेवासंघ व सर्वोदय समाज या संस्थांची स्थापना झाली. मार्च १९४८मध्ये विनोबा दिल्ली येथे जवाहरलाल नेहरू यांच्या विनंतीवरून गेले. भारत-पाक फाळणी झाल्यानंतर परागंदा झालेले लक्षावधी शरणार्थी (सर्व बाजूंनी जीवन उद्ध्वस्त झालेले) दिल्ली, पंजाब, राजस्थान यांमध्ये आले. त्यांना धीर देण्याकरता विनोबांना पंडितजींनी बोलावून घेतले. या दौऱ्यात सर्वधर्मसमभावाचा आदेश देऊन प्रेम आणि सद्‌भावना निर्माण करण्याचा प्रयत्न विनोबांनी केला.

१५ नोव्हेंबर १९८२ रोजी सकाळी ९.४० वाजता पवनार येथे परंधाम आश्रमात सतत सात दिवस प्रायोपवेशन करून भूदान नेते आचार्य विनोबा भावे यांचे वयाच्या ८८व्या वर्षी निधन झाले. विनोबांनी प्रायोपवेशनाद्वारे देहत्याग केला. भारत सरकारने विनोबांना भारतरत्न (मरणोत्तर, १९८३) हा किताब देऊन त्यांचा गौरव केला. (साभार इंटररनेट)

## चित्र रंगवा





## आरोग्य प्रहर

### बहुगुणी नारळाचे विविध फायदे जाणून घ्या



नारळ आणि कोलेस्ट्रॉल याबद्दलचे प्रवाद अनेक वर्ष सुरू आहेत. त्यामुळे नारळ आणि त्याबाबतीतले गैरसमजदेखील त्याच वेगाने पसरलेले आहेत. भारतीय आहारात नारळाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. मग कोशिंबीर असो किंवा पालेभाज्या. सणासुदीला नारळाचे दूध, ओलं खोबरं सढळ हस्ते वापरलं जातं. अनेक घरात सुंदर केस आणि तंदुरुस्त शरीरयष्टी असणाऱ्या कुटुंबांमध्ये आहारात नारळाचा सर्रास वापर केला जातो.

आहारशास्त्रातदेखील नारळ आणि नारळाच्या पदार्थांचे महत्व तितकंच आहे. अगदी नारळ पाणी ते नारळाचं तेल यासारख्या नारळाच्या विविध रूपांचा आहारामध्ये समावेश केला जातो. मधल्या काही काळामध्ये नारळावर एक सरसकट बंदी आली होती. जिथे नारळ खाणे किंवा खोबरं खाणेच किती अपायकारक आहे याबद्दल अनेक गोष्टी सांगितल्या जात असत. मात्र आयुर्वेद आणि आहार शास्त्रानुसार नारळ हा अत्यंत औषधी गुणकारी आणि आरोग्यवर्धक आहे. नारळाचं पाणी थंड गुणाचे आहे. शरीरातील अतिरिक्त चरबीला आला घालण्यासाठी नारळपाणी अत्यंत उपयुक्त आहे. किंबहुना सातत्याने स्पर्धात्मक व्यायाम करणाऱ्यांसाठीदेखील नारळपाणी अत्यंत गुणकारी आहे.

शरीरातील क्षारांचे प्रमाण योग्य प्रमाणात राखण्यासाठी आणि आर्द्रता पुन्हा पूर्ववत करण्यासाठी नारळपाणी उपयुक्त आहे. नारळ पाण्यामध्ये ग्लुकोज प्रथिन पोटॅशियम सोडियम क्लोराइड ही सगळी पोषणमूल्य नारळाच्या पाण्याचे महत्त्व वाढवतात. नारळाच्या पाण्यामध्ये जीवनसत्व अ तसंच जीवनसत्व ब याचे प्रमाण उत्तम असते. त्याचप्रमाणे ओल्या खोबऱ्याचा विचार करायला गेला तर त्याच्यामध्ये उत्तम प्रमाणात स्निग्ध पदार्थ असतात तसेच चवीला ते हलके गोड असते. ओल्या खोबऱ्याचे दूध मोठ्या प्रमाणावर पाश्चात्त्य देशांमध्ये आणि भारतातदेखील वापरले जाते वेगवेगळ्या प्रकारच्या विशेषतः गोड पदार्थ तयार करण्यासाठी ओल्या खोबऱ्याच्या दुधासारखे उत्तम द्रव्य नाही.

# कार्यकर्त्यांनी पक्षासाठी समर्पित भावनेने काम करावे



## भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांचे आवाहन

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजपाचा कार्यकर्ता इतर पक्ष्यांच्या कार्यकर्त्यांपेक्षा वेगळा आहे. तो राष्ट्र प्रथम म्हणून काम करतो . याचे भान ठेवून राजकारणाच्या बाहेर जाऊन काम करा. पार्लमेंट ते पंचायत सर्व ठिकाणी शतप्रतिशत भाजप पाहिजे या करिता पक्षासाठी समर्पित भावनेने काम करा, असे आवाहन भाजप महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष आमदार रवींद्र चव्हाण यांनी भाजप कार्यकर्त्यांना केले.

भाजपा दक्षिण रायगड विस्तृत कार्यकारिणी बैठक क्षात्रैक्य माळी समाज सभागृह, कुरूळ येथे गुरुवारी (दि १०) आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्श करता प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण बोलत होते.

कॉन्ट्रॅक्टर होण्यासाठी पक्षात आलेल्याना स्थान नाही. पक्षासाठी वेळ द्या . संघर्ष करा. समर्पितपणे काम करा. तुमच्यासारख्या संघर्षातून तयार झालेल्या. राष्ट्र प्रथम म्हणून काम करणाऱ्या कार्यकर्त्यांकडून लोकांना अपेक्षा आहेत. आपली भूमिक जनतेला व्यवस्थित सांगा.त्यासाठी बोलके व्हा. शतप्रतिशत भाजप आणण्यासाठी क्रियाशील बना असे प्रदेश अध्यक्ष रविद्र चव्हाण म्हणाले.


**महावितरण** (महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित)

**जाहीर निवेदन**
**जागा भाडयाने मिळणेबाबत**

म.रा.वि.वि. कंपनीच्या पनवेल ग्रा. विभागांतर्गत कोन, आजिवली तसेच खानावले शाखा कार्यालयासाठी, कोन, आजिवली तसेच खानावले तालुका–पनवेल जिल्हा–रायगड या परिसरात सुमारे ४०० चौ. फुट इतकी जागा भाडयाने घ्यावयाची आहे. तरी इच्छुक जागा मालकांनी त्यांची जागा कोणत्या दराने देण्यास ते तयार आहेत. याबाबतचे सीलबंद देयक कार्यकारी अभियंता, म.रा.वि.वि.कं. मर्यादित, पनवेल ग्रामीण विभागीय कार्यालय, पनवेल यांचेकडे दिनांक ३०/०९/२०२६ पर्यंत सादर करावेत.

PRO NO - ०९० **कार्यकारी अभियंता, महावितरण, पनवेल ग्रामीण विभाग.**



**MAHATRANSCO**
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification

| Sr. No. | Tender No.EE/400kV R.S. (O&M) Dn/ NGTN/Tech/ | Description | Estimated cost | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-20/26-27/ Rfx No.7000041518 | Replacement of old NIFPS cabinet of ICT 1 & ICT 2 (P&F) CTR make at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane Under EHV O&M Circle, Panvel. | **Rs. 24,94,520/-** | **19.09.2026 up to 23.59 hrs** |

**EMD 1% of estimate cost i.e. Rs. 24,945.20/-** and Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (DY.EE) Mob No. 9461456635 Email ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER**
**400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**



*वस्तुनिष्ठ बातम्या आणि आकर्षक जाहिरातींसाठी* राम प्रहर



**पनवेल महानगरपालिका**
तालुका – पनवेल, जिल्हा – रायगड

**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अभियंता, पनवेल महानगरपालिका, पनवेल | ०१ सप्तपर्णी, ०१ पिंपळ, ०२ कदंब, ०१ उंबर, ०४ गुलमोहर, ०१ बदाम व ०१ रेन ट्री अशी एकूण ११ झाडे तोडणे | पनवेल महानगरपालिका हद्दीतील **प्रभाग क्रमांक ४ मधील भुखंड क्र.१३बी, सेक्टर १४, खारघर या भूखंडाच्या आवारातील ११ झाडे प्राण्याच्या अंत्यविधीकरीता स्मशानभूमी विकसित करणे बांधकामात ११ झाडे बाधित होत आहेत.** |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक :११ /०९/२०२६
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.२९७/३१९/२०२६

**सही /–**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
पनवेल महानगरपालिका


## पेणमध्ये विज्ञान नाट्योत्सव

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुका विज्ञान नाटयोत्सव २०२६– २७ चे आयोजन सार्वजनिक विद्यामंदिर पेण येथे दिनांक ८ सप्टेंबर रोजी काण्यात आले होते. या नाट्योत्सवात मुख्य विषय विज्ञान व समाज हा होता व उपविषय कृत्रिम बुद्धिमत्ता, मत्र साधन की धोका, इलेक्ट्रिक वाहने, आंतरतारकीय अधिवास, महासागरांचे पुनर्जीवन पिढ्यांचे जतन असे चार उपविषय होते या नाट्य उत्सवात पेण तालुक्यामधून प्रथम क्रमांकश्रीमती सुमतीबाई प्राथमिक विद्यामंदिर पेण शाळेने प्रथम क्रमांक व पेण एज्युकेशन इंग्रजी माध्यम यांनी द्वितीय क्रमांक तर के.ई.एस. इंग्लिश मीडियम स्कूल तृतीय क्रमांक मिळवला तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेमध्ये या शाळेची जिल्हास्तरावर निवड झाली आहे


**कुळगांव बदलापूर नगरपरिषद**

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन – ४२१५०३, ता. अंबरनाथ जि.ठाणे.
ई–मेल: **coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in**, वेबसाइट: **kbmc.gov.in.**

जा.क्र./साबां/८०९/२०२६–२७ दिनांक : ०९/०९/२०२६

**जाहिर ई– निविदा शुध्दीपत्रक क्र.३१/२०२६–२७**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने पेपरामध्ये जाहीर ई–निविदा सुचना क्र.३१/२०२६–२७ जा.क्र. कुबनप/साबां/८०७/२०२६–२७ दि.०८/०९/२०२६ रोजीची नगरपरिषदेच्या पूर्व विभागात रस्त्यावरील खड्डे बुजविणे या कामाची महाराष्ट्र शासनाच्या संकेत स्थळावर (http://mahatenders.gov.in) जाहीर ई–निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. **परंतु सदर ई–निविदेमध्ये अटी व शर्ती मधील १ ते १३ अटी व शर्ती प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. अटी व शर्ती क्र.१४ हि अट काही तांत्रिक अडचणीमुळे प्रसिध्द करण्यात आलेली नाही. त्यामुळे अटी व शर्ती क्र.१४ अट ही खालील प्रमाणे आहे.**

**अटी व शर्ती क्र. १४. नगरपरिषद हद्दीतील पूर्व विभागातील रस्त्यावरील खड्डे बुजविणे कामी ठेकेदाराकडे**

| अ.क्र. | साहित्य | सख्या (Quantity) |
|---|---|---|
| १ | Hot mix plant ६०–९० tph | १ |
| २ | Grader owned | १ |
| ३ | Sensor paver owned | १ |
| ४ | Soil Compactor owned | १ |
| ५ | २ Vibratory roller owned | २ |
| ६ | Mastic Paver hired | १ |
| ७ | Tippers | ५ |

**वरील अटी व शर्ती क्रमांक १४ मधील ठेकेदाराकडे सर्व साहित्य संख्ये प्रमाणे असल्याचे पुरावे देणे बंधनकारक आहे.. तसेच वरील साहित्य हे ज्या कंपनीवरती ठेकेदार भरणार आहे त्या कंपनीच्या नावाचे कागदपत्र असणे बंधनकारक आहे. तसेच एकही साहित्य हे नसल्यास ठेकेदाराची निविदा रद्द करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.**

**सही/–**
**मुख्याधिकारी**
**कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव**



**जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/म.प्र–१, दि.१८/१०/२०२३**
**परिशिष्ट–३**
**(ई–निविदेसाठी जाहिरात नमुना)**

**महाराष्ट्र शासन**
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय.**
**रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड**
**ई–मेल :– eerid२४@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७**
**ई–निविदा सूचना क्र.६५ सन २०२६–२७**

**महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग. कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४** हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई–निविदा सूचना व ई–निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ.क्र | कामांचे नाव | निविदेची किंमत रु | इसारा रक्कम रु | काम पूर्ण करणेचा कालावधी | ई–निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | काळ सिंचन प्रकल्पांतर्गत डोलबहाळ बंधाराच्या उजव्या तीरावर संरक्षण भिंत नव्याने बांधणे | ९९.८७.५३६/– (स्वामित्व शुल्क धरुन) | १,००,०००/– | ०६ महिने | रु.२०००/–+ रु. ३६०/–२३६०/– (ना–परतावा) | वर्ग–४ व त्यावरील |

**निविदा उपलब्ध कालावधी दि.१०/०९/२०२६ ते दि.१९/०९/२०२६**
**निविदा उघडण्याचा दि. १९/०९/२०२६**

खालील संकेतांक स्थळावर ई–निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचया दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ताः कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं. ४०२३०४ ई–मेल eerid२४@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई–निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
८. ई–निविदे प्रक्रियेमध्ये निविदा भरतांना इंटरनेटमध्ये अथवा सर्व्हर डाऊन अथवा सर्व्हरमध्ये त्रुटी निर्माण झाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

टिपः– निविदा भरतांना आपले दर G.S.T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.

**सही/–**
**(इंजि. राकेश धाकतोडे)**
**कार्यकारी अभियंता. रायगड**
**पाटबंधारे विभाग, कोलाड.**

विमाका/कोवि/२०२६–२०२७/९१



**सिडको** शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे दिले असुन **वाटपपत्र/ करारनामा** करणे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र (हे. आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनिशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची सद्यस्थिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | | | | |
| १ | तळोजा १००९ | १/२००८ | २५२/१-७ | ०-३१-० | ४५० चौ.मी. पैकी १५० चौ.मी. | भूखंड क्र.९८, सेक्टर-१४, क्षेत्र-३०० चौ.मी. | दिवाणी दावा क्र.रे.मु.क्र-३७४/२०२१ मधील न्यायालयीन आदेशानुसार प्रतिवादी श्री. बळीराम बाबुराव कदम यांना इरादित भूखंड क्र.९८, सेक्टर-१४, क्षेत्र ३०० चौ.मी. | रे.मु.क्र-३७४/२०२१ |
| | | | २५०/१७ | ०-२१-० | | | | |
| | | | **एकूण क्षेत्र** | **०-५२-०** | | | | |
| | तळोजा १००९ | १/२००८ | २५९/९/२ | ०-२०-० | १५० | | | |
| | | | **एकूण क्षेत्र** | **०-५२-०** | ३०० चौ.मी. | | | |
| २ | पेंधर | ४ब | ८४/० ९०/० ९३/० ५४/१पै ५५/० ५६/० ५७/१पै ५७/२ | ०-२७-१ ०-४४-३ १-११-८ ०-१२-० ०-१५-४ ०-१८-५ ०-८५-४ ०-२-० **३-१६-५** | एकूण १२१५० चौ.मी. पैकी हिस्सेवाटणी नुसार १९५० चौ.मी. | तळोजा येथे भुखंड क्र. ६५B, सेक्टर-१७, क्षेत्र-१९५० चौ.मी. | अब्दुल कादिर अब्दुल लतीफ पटेल | एकूण १२१५० चौ.मी. मंजुर पात्रतेपैकी मा.न्यायालयीन दिवाणी दावा क्र.७६/२०२१ मधील दि.२२.०४.२०२१ रोजीच्या तडजोड पुरशीस आदेशाप्रमाणे अब्दुल कादिर अब्दुल लतीफ पटेल यांच्या हिस्स्यास येणारी १९५० चौ.मी. पात्रता |
| | पेंधर | ४क | १००/० १०४/०पै १०५/० १०८/०पै ८९/० | ०-८६-३ ०-४०-२ ०-५७-३ ०-०९-९ ०-५८-० **२-५१-७** | | | | |
| | पेंधर | ४अ | ८१/० ८७/० ८८/० १०२/० ५७/३पै | २-०४-९ ०-६८-५ ०-२०-४ ०-८९-८ ०-२७-० **४-१०-६** | | | | |
| | पेंधर | ४ड | ९१/० ९२/० | १-९९-३ १-८०-१ **३-७९-४** | | | | |
| | तळोजा | ३८ | ७३/१ | ०-३०-० | | | | |
| ३ | उलवे ३४१ | गव्हाण ८१५ | १५७/३ +४+६ +९D | ०-१४-२ | १०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. २१G, सेक्टर-२२, क्षेत्र-९९.९६ चौ.मी. | कै. बाळकृष्ण धाऊ पाटील (मयत) यांचे वारस १) श्रीमती वत्सला बाळकृष्ण पाटील, २) श्रीमती नैनिता संदिप पारिंगे, ३) कु. प्राजक्ता बाळकृष्ण पाटील ४) श्री. प्रतिक बाळकृष्ण पाटील | --- |
| ४ | उलवे १७६६ | गव्हाण ४११ | ४८/८ ४२/१० ४५/३ ७६/५ | ०-१७-२ ०-५-० ०-२४-० ०-२०-६ | ६०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ४००, सेक्टर-१७, क्षेत्र-५९९.८४ चौ.मी. | श्रीमती कृष्णाबाई पांडुरंग म्हात्रे | --- |
| ५ | उलवे १६८ | गव्हाण ३१५ | ९/१ | ०-३२-९ | ३०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. ११F, सेक्टर-२२, क्षेत्र-३०० चौ.मी. | **कै. दामा रामा तांडेल (मयत) यांचे वारस** श्रीमती यमुनाबाई दत्तात्रेय भोईर | --- |
| ६ | उलवे ६१३ | गव्हाण ५०अ | २३८/ ६क | ०-०५-३ | ९०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र. A-४५, सेक्टर-१३, क्षेत्र-३०० चौ.मी. | शेख उस्मान शेख अली | --- |
| | | गव्हाण ७१७ | २४०/० | ०-१७-४ | | | | |
| | | गव्हाण ६७५+ ६७६ | २३९/२ | ०-७९-१ | | | | |
| ७ | २९७ | १४६D +३६१B | ३०५/२+३+३६० ते ३१०/०+३११/१+३ १२/२Plot No.२८(२) | ५४३७ | ४५० चौ.मी. | भूखंड क्र. ६१, सेक्टर-६ए, क्षेत्र ८०० चौ.मी कामोठे नोड | **(संचिका क्र. २९७ मधील भुधारक)** कै. जगन्नाथ गंगाराम कांडपिळे कै. पुष्पा जगन्नाथ कांडपिळे यांचे वारस **१) श्री. दिपक जगन्नाथ कांडपिळे २) श्रीमती. इंद्रायणी किरण कांडपिळे ३) श्री. मनोहर कृष्णाजी कांडपिळे, (संचिका क्र. १५२ मधील भुधारक)** कै. यशवंत गंगाराम कांडपिळे यांचे वारस **१) श्री. संजय यशवंत कांडपिळे, २) श्री. अजय यशवंत कांडपिळे (संचिका क्र ५६२ मधील भुधारक)** कै. सुलोचना हनुमंत कांडपिळे कै. जयवंत हनुमंत कांडपिळे यांचे वारस १) कै. प्रमोद जयवंत कांडपिळे यांचे वारस १.१) श्रीमती. किशोरी प्रमोद कांडपिळे, १.२) श्री. तनय प्रमोद कांडपिळे १.३) श्री. देवेन प्रमोद कांडपिळे, २) कै. रमेश हनुमंत कांडपिळे यांचे वारस २.१) श्रीमती. उज्वला रमेश कांडपिळे, २.२) श्री. जतीन रमेश कांडपिळे, २.३) श्री. प्रवीण रमेश कांडपिळे ३) कै. चंद्रकांत हनुमंत कांडपिळे यांचे वारस ३.१) श्रीमती. नलीनी चंद्रकांत कांडपिळे | निरंक |
| | १५२ | ३८३B | ३०५/२+३+३०६ ते ३११/२+३११/३+३ १२/२Plot No.१६, | १२४४.४० | २०० चौ.मी. | | | |
| | | | ३०५/२+३+३०६ ते ३१०+३११/१+३११ /३+३१२/२ Plot No.२२(१) | १२२४.०० | | | | |
| | ५६२ | ५३१A | ३०५/२+३+३०६ ले ३१०+३११/१+३११ /३+३१२/२/Plot no. १२ | १४४९.२ | १५० चौ.मी. | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संपादित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा / हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सुचनेप्रमाणे प्रसिध्द झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितानी सदर जाहीर सुचना प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पुरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :– मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, १२.५% टक्के भूमी विभाग (रायगड), सिडको भवन, तळ मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
**www.cidco.maharashtra.gov.in**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको/जनसंपर्क/२२१/२०२६–२७**

# सहा फुटांपर्यंतच्या गणेशमूर्तींचे कृत्रिम तलावातच विसर्जन

## पर्यावरणपूरक उत्सवासाठी महापालिकेचे आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवात नैसर्गिक जलस्रोतांचे प्रदूषण रोखण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिकेने यंदा १७० कृत्रिम विसर्जन तलावांची निर्मिती केली आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार सहा फुटांपेक्षा कमी उंचीच्या गणेशमूर्तींचे विसर्जन कृत्रिम तलावातच करणे अपेक्षित असून, मोठ्या मूर्तींसाठीही शक्यतो कृत्रिम तलावांना प्राधान्य देण्याचे आवाहन महापालिकेने केले आहे.



नागरिकांना घराजवळच विसर्जनाची सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने मागील वर्षाच्या तुलनेत यंदा कृत्रिम तलावांची संख्या वाढविण्यात आल्याची माहिती महापालिकेने दिली आहे.

महापालिकेच्या माहितीनुसार, नवी मुंबईतील पारंपरिक विसर्जनस्थळांवर गणेशोत्सवाच्या काळात मोठी गर्दी होते. ही गर्दी विभागली जाण्याबरोबरच नैसर्गिक जलस्रोतांचे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी कृत्रिम तलावांचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला आहे. या ठिकाणे परिमंडळ आणि अभियांत्रिकी विभागाने निश्चित केली असून तलाव उभारणीची कामे अंतिम टप्प्यात आहेत.

गणेशोत्सव मंडळांना मंडप उभारणीसाठी कोणतेही शुल्क आकारले जात नसून मंडप परवानगीची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी एक खिडकी पद्धतीची ऑनलाइन ई-सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पर्यावरणाचे रक्षण करत गणेशोत्सव साजरा करण्यासाठी नागरिकांनी शाडूच्या आणि पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर करावा तसेच विसर्जनासाठी कृत्रिम तलावांना प्राधान्य द्यावे, असे आवाहन महापौर सुजाता पाटील आणि महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी केले आहे.

कृत्रिम तलावांमुळे गणेशमूर्ती आणि निर्माल्यामुळे नैसर्गिक जलस्रोतांवर होणारा परिणाम कमी होण्यास मदत होते. त्यामुळे नागरिकांनी समुद्र, खाडी किंवा अन्य नैसर्गिक जलस्रोतांमध्ये विसर्जन करण्याऐवजी घराजवळील कृत्रिम तलावांचा वापर करावा, असे आवाहन महापालिकेने केले आहे. शक्य असल्यास घरच्या घरी मूर्तीचे विसर्जन करण्यासही प्राधान्य देण्याची सूचना करण्यात आली आहे.

**शाडूच्या मूर्तींचा आग्रह**

गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि प्लास्टिकमुक्त पद्धतीने साजरा करण्यासाठी नागरिकांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीऐवजी शाडू मातीच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करावी, असे आवाहन महापालिकेने केले आहे. सजावटीमध्ये प्लास्टिक आणि थर्माकोलचा वापर टाळून कापड, कागद तसेच पुनर्वापर करता येणाऱ्या साहित्याचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. कर्णकर्कश ध्वनी टाळून मर्यादित आवाजात वाद्यांचा वापर करावा तसेच लेझर दिव्यांचा वापर टाळावा, असेही महापालिकेने स्पष्ट केले आहे.

**विसर्जनस्थळांवर यंत्रणा**

नैसर्गिक आणि कृत्रिम विसर्जनस्थळांवर भाविकांच्या सुविधेसाठी महापालिकेकडून आवश्यक व्यवस्था करण्यात येणार आहे. स्वयंसेवक, जीवरक्षक आणि अग्निशमन दलाचे कर्मचारी तैनात केले जातील. आरोग्य, पिण्याचे पाणी, स्वच्छता, विद्युत व्यवस्था आणि सीसीटीव्हीची सुविधा उपलब्ध असेल. निर्माल्य संकलन आणि वाहतुकीसाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली असून तराफे, फोर्कलिफ्ट यांसारखी यंत्रसामुग्रीही सज्ज ठेवण्यात येणार आहे.

**कोठे किती कृत्रिम तलाव?**

बेलापूर २२, नेरुळ २९, वाशी १६, तुर्भे २१, कोपरखैरणे १६, घणसोली १६, ऐरोली २५, दिघा २५.

## कोपरखैरणेत बारमध्ये तरुणाला मारहाण; दोघांवर गुन्हा दाखल

**नवी मुंबई : बातमीदार**

कोपरखैरणे येथील क्लासिक बार अँड रेस्टॉरंटमध्ये जेवणासाठी गेलेल्या एका तरुणाला विनाकारण शिवीगाळ करत कड्याने मारहाण केल्याची घटना रविवारी रात्री घडली. या प्रकरणी कोपरखैरणे पोलीस ठाण्यात दोन भावांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला,

ऋषीकेश मच्छिंद्र जाधव (२५, रा. सेक्टर १८, कोपरखैरणे) हे रविवारी (६ सप्टेंबर) रात्री १ वाजेच्या सुमारास मित्रांसह क्लासिक बारमध्ये जेवणासाठी गेले होते. त्यावेळी आरोपी रोहित तुकाराम चोरमले (२८) आणि राहुल तुकाराम चोरमले (२६, दोघे रा. कोपरखैरणे) यांनी ऋषीकेश यांच्याशी विनाकारण वाद उकरून काढला. वाद वाढल्यानंतर आरोपींनी ऋषीकेश यांना शिवीगाळ करत लाथाबुयांनी आणि हातातील कड्याने चेहऱ्यावर जोरदार मारहाण केली. या हल्ल्यात ऋषीकेश यांच्या डाव्या गालावर दुखापत झाली आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, कोपरखैरणे पोलीस अधिक तपास करत आहेत.

# महावितरणच्या ऐरोली उपविभागात वीजचोरीविरोधात धडक कारवाई

## एका दिवसात आढळली १०५ ठिकाणी वीजचोरी

**नवी मुंबई : बातमीदार**



वीजचोरीला आळा घालण्यासाठी व वीजवापरातील अनियमितता शोधण्यासाठी वीज चोरी करणाऱ्यांविरोधात महावितरणने धडक मोहीम राबवली आहे. महावितरणच्या भांडूप नागरी परिमंडलात दि. ३ सप्टेंबर, २०२६ रोजी मुख्य अभियंता संजय पाटील व अधीक्षक अभियंता वाशी, दीपक पाटील यांच्या नेतृत्वाखाली एकाच दिवशी ऐरोली उपविभागातील ऐरोली गाव, साईनाथ वाडी, देशमुख वाडी, गोठवली व घणसोली येथे अनधिकृत इमारतींमध्ये व्यापक वीजचोरी शोधमोहीम राबविण्यात आली. राबविण्यात आलेल्या या धडक मोहिमेत विविध ठिकाणी तपासणी करण्यात आली असून १०५ प्रकरणांमध्ये वीजचोरी अथवा वीजवापरातील अनियमितता आढळून आली आहे. यामध्ये, विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ अंतर्गत ७८ ग्राहकांनी १,४३,०६३ युनिटची ३१.३१ लाखाची वीजचोरी केल्याचे आढळून आले. या धडक कारवाईमुळे वीज चोरांचे धाबे दणाणले आहेत.

या मोहिमेसाठी ७ विशेष पथके कार्यरत होती. त्यामध्ये मुख्य अभियंता सोबतच ५ कार्यकारी अभियंते तसेच सुमारे ५० अधिकारी व कर्मचारी, अशा एकूण ५५ हून अधिक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. पथकांनी विविध ठिकाणी वीज जोडण्या, मीटरची स्थिती, वीजवापराची पद्धत तसेच वीजवापरातील संभाव्य अनियमितता यांची सखोल तपासणी केली. या तपासणीदरम्यान एकूण १०५ प्रकरणांमध्ये वीजचोरी अथवा वीजवापरातील अनियमितता आढळून आली. यामध्ये, विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत ७८ ठिकाणी वीजचोरी निश्चित करण्यात आली आहे. याशिवाय कलम १३५ अंतर्गत २२ संशयित वीजचोरीची प्रकरणे आढळून आली असून, ही प्रकरणे पुढील देखरेखीखाली ठेवण्यात आली आहेत. तसेच विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १२६ अंतर्गत ३ प्रकरण व साध्या मूल्यांकनाची २ प्रकरणे आढळून आली आहेत .

विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १३५ अंतर्गत ज्या ७८ प्रकरणांमध्ये एकूण १,४३,०६३ युनिटची रु. ३१.३१ लाखाची वीजचोरी करण्यात आली आहेत. यामध्ये, ऐरोलीतील माऊली अपार्टमेंट मधील १८ ग्राहकांनी २६,७५५ युनिटची रु. ५.३३ लाखाची, कृष्णा हाईट्स मधील ६ ग्राहकांनी ५,५३० युनिटची रु. १.२० लाखाची, मातोश्री अपार्टमेंट मधील ११ ग्राहकांनी १२,९५६ युनिटची रु. २.५४ लाखाची, ओमसाई अपार्टमेंट मधील १२ ग्राहकांनी ११,१६७ युनिटची रु. १.८६ लाखाची, पनशील अपार्टमेंट मधील ०३ ग्राहकांनी ११,७०० युनिटची रु. ३.१८ लाखाची, शारदा अपार्टमेंट मधील ०२ ग्राहकांनी १,९३७ युनिटची रु. ०.३२ लाखाची, स्मशानभूमी गार्डन मधील २ ग्राहकांनी ३९,६२९ युनिटची रु. ९.६३ लाखाची, सिहांकित निवास गार्डन मधील ८ ग्राहकांनी ४,७३२ युनिटची रु. ०.९१ लाखाची, भागीरती इमारतीत ९ ग्राहकांनी ११,६६४ युनिटची रु. २.२३ लाखाची तर इतर ठिकाणी ७ ग्राहकांनी १६,९९३ युनिटची रु. ४.११ लाखाची वीजचोरी केली आहे. तसेच, साध्या मूल्यांकनाची २ प्रकरणांमध्ये ग्राहकांनी ४,०८२ युनिटचे रु. ०.६३ लाख थकविले आहेत. या प्रकरणांमध्ये मुल्यांकन करण्याची प्रक्रिया सुरु असून विद्युत अधिनियम २००३ च्या कालम १३५ अंतर्गत कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

# मुंबईतील गणेशमूर्ती विसर्जनाचा वाशीवर भार; वाहतूक नियाजेनाचे आव्हान



(संग्रहित छायाचित्र)

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मुंबईतील काही मोठ्या गणेशमूर्तींचे वाशी खाडीमध्ये विसर्जन करण्यात येते. त्यामुळे या परिसरात होणारी गर्दी आणि त्यातून निर्माण होणारी वाहतूक कोंडी नवी मुंबई पोलिसांसमोरचे प्रमुख आव्हान आहे. या पार्श्वभूमीवर नवी मुंबई पोलिसांच्या परिमंडळ-एक अंतर्गत वाशी विभागातील गणेश मंडळांच्या पदाधिकाऱ्यांसोबत मंगळवारी समन्वय बैठक घेण्यात आली.

गणेशोत्सवासाठी आवश्यक परवानग्या मिळण्यास होणारा विलंब, मंडप उभारणी, वीजपुरवठा, सिडकोशी संबंधित बाबी तसेच पाणीपुरवठ्याच्या अडचणी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांनी या बैठकीत मांडल्या. विविध विभागांशी समन्वय साधून या अडचणी लवकर सोडविण्याचे आश्वासन पोलिसांकडून देण्यात आले. मंडळांना प्रशासनाशी संपर्क साधताना अडचण येऊ नये यासाठी 'एक गणपती, एक कर्मचारी' या संकल्पनेनुसार पोलीस कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत.

मुंबईतील काही मोठ्या गणेशमूर्ती विसर्जनासाठी वाशी खाडी परिसरात येतात. त्यामुळे विसर्जनाच्या काळात वाशीतील प्रमुख रस्त्यांवर वाहनांची गर्दी होऊन वाहतुकीचा वेग मंदावण्याची शक्यता असते. मुंबईतील गणेश मंडळांशी समन्वय साधून विसर्जनाच्या वेळी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक नियोजन केले जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले. मात्र, यंदा पार्किंगचा प्रश्न पोलिसांसाठी विशेष चिंतेचा विषय ठरणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात मोठ्या संख्येने वाहने रस्त्यावर येतात; मात्र त्या तुलनेत उपलब्ध रस्ते आणि पार्किंगची जागा मर्यादित आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा होणार नाही अशा पद्धतीने पार्किंगचे नियोजन करण्यावर पोलिसांचा भर राहणार आहे.गणेशोत्सवाच्या तयारीसंदर्भात दहीहंडी उत्सवात मंडळे, लोकप्रतिनिधी आणि नागरिकांनी पोलिसांना सहकार्य केल्याचे सहआयुक्त दीपक साकोरे यांनी नमूद केले. त्याचप्रमाणे गणेशोत्सवातही मंडळांनी वाहतूक व्यवस्था आणि ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन पोलिसांनी केले.

गणेशोत्सव जवळ येत असताना मंडळांच्या परवानग्या आणि अन्य प्रशासकीय अडचणी वेळेत दूर करण्याबरोबरच विसर्जनाच्या दिवशी वाशीतील वाहतूक सुरळीत ठेवण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे. मुंबईतील गणपतींच्या विसर्जनामुळे वाढणारी गर्दी, वाहनांचा ताण आणि पार्किंगची समस्या लक्षात घेता यंदाची वाहतूक व्यवस्था पोलिसांच्या नियोजनाची खरी कसोटी ठरणार आहे.

गणेशोत्सवातील डीजे आणि ध्वनिक्षेपकांच्या वापर हा ध्वनी प्रदूषणाच्या नियमांनुसार शांतता क्षेत्र, औद्योगिक क्षेत्र तसेच दिवस आणि रात्रीसाठी निश्चित केलेल्या ध्वनीमर्यादांचे पालन करणे बंधनकारक राहणार आहे.

# गणेशोत्सवानिमित्त पनवेल एसटी आगारातून अतिरिक्त बस आणि गट आरक्षणाची सोय



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवानिमित्त कोकणासह पश्चिम महाराष्ट्राच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेऊन पनवेल एसटी आगाराने अतिरिक्त बसचे नियोजन केले आहे. गतवर्षीच्या तुलनेत यंदा गट आरक्षणालाही चांगला प्रतिसाद मिळाला असून, आतापर्यंत ३० गाड्यांचे गट आरक्षण झाले आहे. त्याचवेळी नवी मुंबईतून गणेश भक्तांसाठी ११२ मोफत बस सोडण्यात येणार असल्याने गणेशोत्सवाचा प्रवास अधिक सुलभ होण्याची अपेक्षा आहे.

गणेशोत्सवानिमित्त पनवेल एसटी आगारातून कोकणाच्या दिशेने जाणाऱ्या बसच्या फेऱ्या वाढविल्या आहेत. तसेच नऊ आरक्षित बसही सोडण्यात येणार आहेत. अतिरिक्त बसची वाहतूक ११ सप्टेंबरपासून सुरू होणार असून, ११ सप्टेंबरला सहा, १२ सप्टेंबरला २३ आणि १३ सप्टेंबरला एक अतिरिक्त बस सोडण्यात येणार आहे. गणेशोत्सवाच्या काळात पनवेल हे मुंबई, नवी मुंबईसह डोंबिवली, कल्याण आणि नालासोपारा परिसरातील नागरिकांसाठी कोकणाकडे जाण्याचे महत्त्वाचे केंद्र मानले जाते.

> **यंदा गट आरक्षणाला गतवर्षीपेक्षा चांगला प्रतिसाद मिळाला आहे. पनवेल आगारातून आतापर्यंत ३० बसचे गट आरक्षण झाले आहे. मुंबई आणि अन्य भागांतून पनवेल, नवी मुंबई परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरिक स्थलांतरित झाल्याने या भागातून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या वाढत आहे.**
> **-ज्ञानेश्वर म्हात्रे,**
> सहाय्यक वाहतूक अधीक्षक, पनवेल आगार

दरम्यान, शिवसेना (एकनाथ शिंदे) पक्षाच्यावतीने नवी मुंबईतील गणेशभक्तांसाठी ११२ मोफत एसटी बसची व्यवस्था करण्यात आली आहे. ११ सप्टेंबर रोजी ऐरोली, कोपरखैरणे, वाशी, नेरुळ आणि सीबीडी-बेलापूर येथून या बस कोकण, कोल्हापूर तसेच पश्चिम महाराष्ट्राच्या दिशेने रवाना होणार आहेत. यासाठी ८,४०० प्रवाशांनी नावनोंदणी केल्याची माहिती नगरसेवक तथा गटनेते मनोज हळदणकर यांनी दिली.

# सीबीडीमध्ये नागरिकांसाठी एसटी स्मार्ट शिबिर



**नवी मुंबई : बातमीदार**

सी.बी.डी. बेलापूर, सेक्टर - ३ येथे प्रभाग क्र. २८ मधील नागरिकांसाठी 'एसटी स्मार्ट शिबीर' आयोजित करण्यात आले होते. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. भाजपाच्या स्थानिक नगरसेविका व स्थायी समिती सदस्या स्वाती गुरखे-साटम यांच्यातर्फे हा उपक्रम राबविण्यात आला.

याप्रसंगी नागरिकांना एनसीएमसी स्मार्ट कार्डचे महत्त्व पटवून देण्यात आले. तसेच योग्य ते मार्गदर्शन करून त्यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून घेतली.एसटी प्रवासातील सवलतींचा लाभ घेण्यासाठी एन सीएमसी स्मार्ट कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. महिलांसाठी ५०% प्रवास सवलत, ६५ ते ७५ वर्षे वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांसाठी ५०% प्रवास सवलत, तसेच ७५ वर्षांवरील अमृत ज्येष्ठ नागरिकांसाठी १००% मोफत प्रवासाचा लाभ मिळवण्यासाठी हे एनसीएमसी स्मार्ट कार्ड अत्यंत लाभदायक असल्याचे भाजपच्या नगरसेविका स्वाती गुरखे यांनी सांगितले.

# गव्हाण विद्यालयाच्या विद्यार्थ्यांची निसर्गरम्य क्षेत्रभेट आणि वनभोजन

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे यशस्वीपणे राबविण्यात येत असलेल्या रयत गुरुकुलप्रकल्पांतर्गत इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांची क्षेत्रभेट मोरावे येथील लांगेश्वर मंदिर व परिसरातउत्साहपूर्ण आणि आनंददायी वातावरणात पार पडली.



निसर्गाच्या सान्निध्यात अनुभवाधारित शिक्षण, जैवविविधतेचे निरीक्षण, खेळ, मंदिरदर्शन आणि सामूहिक वनभोजन अशा विविध उपक्रमांनी ही क्षेत्रभेट संस्मरणीय ठरली.

बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आली होती. निसर्गाच्या सान्निध्यात अनुभवाधारित शिक्षण गुरुकुल विभाग प्रमुख. संदीप भोईर यांच्या नियोजनानुसार विद्यार्थ्यांनी लांगेश्वर परिसरातीलनिसर्गरम्य वातावरणाचा मनमुराद आनंद घेतला. परिसरातील विविध झाडे, वनस्पती, वेली आणिजैवविविधतेचे विद्यार्थ्यांनी बारकाईने निरीक्षण केले. एआय विभाग प्रमुख शीतलकुमार म्हात्रे यांनीएआयच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध वनस्पतींची ओळख करून देत त्यांचे सजीव सृष्टीतील महत्त्वसमजावून सांगितले. विद्यार्थ्यांनीही उत्सुकतेने विविध वनस्पतींबाबत प्रश्न विचारत त्यांची माहिती जाणूनघेतली. त्यामुळे पाठ्यपुस्तकात शिकलेले ज्ञान प्रत्यक्ष निसर्गाच्या सान्निध्यात अनुभवण्याची संधीविद्यार्थ्यांना मिळाली. निसर्गरम्य परिसरात विविध खेळ खेळत विद्यार्थ्यांनी आनंद लुटला. श्रावणमहिन्याच्या औचित्याने विद्यार्थ्यांनी लांगेश्वर मंदिरातील स्वयंभू शिवशंकराचे दर्शन घेत विद्यालयाच्याशैक्षणिक प्रगतीसाठी प्रार्थना केली.

या क्षेत्रभेटीतील स्नेहभोजनाच्या आयोजनात विद्यार्थ्यांनीही स्वतः पुढाकार घेत तयारीसाठीउत्स्फूर्तपणे सहकार्य केले. भोजनाच्या तयारीपासून ते विविध व्यवस्थेपर्यंत विद्यार्थ्यांनी आपापल्या परीनेसहभाग नोंदविला. त्यामुळे क्षेत्रभेट ही केवळ मनोरंजनाची न राहता विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतूनस्वावलंबन, सहकार्य, श्रमप्रतिष्ठा आणि सामूहिक जबाबदारीचा अनुभव देणारी ठरली.रयत शिक्षण संस्थेचेसंस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी दिलेला "स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद" हा विचार या प्रसंगीविद्यार्थ्यांनी खऱ्या अर्थाने प्रत्यक्ष कृतीतून अनुभवला. स्वतःच्या कामासाठी स्वतः पुढाकार घेणे, श्रमाचीप्रतिष्ठा जपणे आणि सामूहिक कार्यात योगदान देणे, या मूल्यांचा धडा विद्यार्थ्यांनी या क्षेत्रभेटीतगिरवला. त्यामुळे गुरुकुल प्रकल्पाच्या उद्दिष्टांना या उपक्रमातून अधिक व्यापक आणि जीवनोपयोगीस्वरूप प्राप्त झाले.

लांगेश्वर ४० प्लस मोरावे क्रिकेट टीमच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी वनभोजनाची सुंदर व्यवस्थाकरण्यात आली होती. टीम प्रमुख व विद्यालयाच्या माजी विद्यार्थी संघाचे सदस्य मदन पाटील यांच्यामार्गदर्शनाखाली धावजी पाटील, विनायक कोळी, सुभाष पाटील, अमर म्हात्रे, गणेश काशिनाथ पाटील,गणेश वसंत पाटील, गणेश कोळी, संजय पाटील, रतन पाटील, कृष्णा म्हात्रे, अमित पाटील, अंकुश म्हात्रे,लहू पाटील, दीपक पाटील व विशाल पाटील यांनी विशेष परिश्रम घेत विद्यार्थ्यांसाठी स्नेहभोजन तयारकेले.विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांनी आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी केलेल्या या प्रेमळ उपक्रमामुळे'माजी विद्यार्थी आणि विद्यालय' यांच्यातील स्नेहबंध अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

या क्षेत्रभेटीत प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक. विलासराव लेंभे , गुरुकुल प्रमुख संदीप भोईर, शिक्षक प्रतिनिधी शीतलकुमार म्हात्रे, . गीतांजली म्हात्रे, चारुशीला ठाकूर, प्रशांत परदेशी, ग्रंथपाल महेश म्हात्रे तसेच शिपाई. जनार्दन खेरे यांनी सहभाग घेत क्षेत्रभेट यशस्वी केली.

# गणेशोत्सवात वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलीस सज्ज

## मुंबई–गोवा महामार्गावर विविध उपाययोजना

**महाड : प्रतिनिधी**

गणेशोत्सव काळात मुंबई–गोवा राष्ट्रीय महामार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी महामार्ग पोलीस यंत्रणेकडून हॉटेल व्यावसायिकांसहित पेट्रोल पंपधारकांना सूचना करण्यात आले आहे. या सूचनांचे पालन करण्याचे निर्देश महामार्ग पोलिसांनी दिले आहेत

कोकणातील महत्त्वाच्या असणाऱ्या गणेशोत्सवाला १४ सप्टेंबरपासून प्रारंभ होत आहे. या काळात मुंबई–गोवा महामार्गावरून रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यासह रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर चाकरमानी मुंबई, पुण्यासह गुजरात राज्यातून दाखल होणार आहेत. हे भाविक मुंबई–गोवा महामार्गावरून वाहनाने प्रवास करतात.




कोकणातील गणेशोत्सवासाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून तब्बल तीन हजार एसटी बसेस सोडण्यात येणार आहेत. त्याचबरोबर हजारोंच्या संख्येने ट्रॅव्हल्स बसेस व आपल्या खासगी वाहनाने भाविक या महामार्गावरून प्रवास करणार आहेत.

या पार्श्वभूमीवर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी पोलिसांनी महामार्गालगत असणाऱ्या हॉटेल व्यावसायिकांना आणि पेट्रोल पंपधारकांना हॉटेलमध्ये अल्पोपहार करण्याकरता येणाऱ्या वाहनांना हॉटेलमध्ये प्रवेश करताना व हॉटेलमधून बाहेर पडताना वाहनांची वाहतूक कोंडी होणार नाही तसेच कोणताही अपघाताचा प्रसंग घडू नये याकरिता हॉटेलच्या बाहेर सुरक्षारक्षकांची नेमणूक करावी, असे निर्देश एका परिपत्रकाद्वारे त्यांच्यासह पेट्रोल पंपधारकांना दिले आहेत.

महामार्गावर अपघात घडल्यास ८४२१७००१६४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन महामार्ग पोलीस मदत केंद्र महाड यांनी केले आहे. त्याचबरोबर महामार्गावर माणगाव तालुक्यातील कशेणेपासून पोलादपूरपर्यंतच्या ५७ किलोमीटर अंतरामध्ये सहा पोलीस अधिकारी आणि ६० कर्मचाऱ्यांची नेमणूक केली असल्याचे महामार्ग वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रामेश्वर ढाकणे यांनी सांगितले.

अज्वानी ट्रस्टच्या दोन रुग्णवाहिका व राष्ट्रीय महामार्ग विभागाची अपघातग्रस्त वाहनांना रस्त्यावरून बाजूला करण्यासाठी एक क्रेन तसेच महामार्ग विभागाची एक क्रेन; याचबरोबर अन्य व्यवस्थादेखील केली असल्याचे ते म्हणाले.

# नागोठण्यातील पूरबाधितांना जीवनावश्यक वस्तूंचे वाटप; लायन्स क्लबची बांधिलकी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे परिसरात आलेल्या पुरामुळे अनेक नागरिकांचे मोठे नुकसान झाले. या पूरबाधित नागरिकांना लायन्स क्लबच्या वतीने जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले.

नागोठणे येथील स्व. बाळासाहेब ठाकरे बालोद्यानात मदत वाटपाचा कार्यक्रम झाला. यावेळी पूरग्रस्त नागरिकांना तूरडाळ १ किलो, मुगडाळ १ किलो, तेल १ किलो, साखर १ किलो, तांदूळ ५ किलो, बिस्कीट पाकीट, ४ ताटे, ४ वाट्या, २ भाजीचे मोठे चमचे, १ सतरंजी व १ चादर अशा जीवनावश्यक वस्तूंचे वाटप इंटरनॅशनल लायन्स क्लब फाउंडेशनकडून नागोठणे क्लबच्या माध्यमातून करण्यात आले तसेच लायन्स क्लब सरगम पनवेलच्या वतीने महिलांना सॅनिटरी पॅडचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास पीएमजेएफ अनिल म्हात्रे, अध्यक्ष विलास चौलकर, एमजेएफ प्रकाश जैन, यशवंत चित्रे, विवेक सुभेकर, विजय शहासने, सुनील कुथे, सखाराम ताडकर, संतोष शहासने, विशाल शिंदे, सुजाता जवके, विद्या म्हात्रे, अनुराधा शहासने, लायन्स क्लब सरगम पनवेलचे अध्यक्ष डॉ. आदित्य दोषी, डॉ. मानदा पंडित, स्वाती गोडसे, संध्या महानुभव यांच्यासह पूरग्रस्त नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सुभेकर यांनी केले.




# आरएसएसच्या शताब्दी वर्षानिमित्त माणगावमध्ये युवा संमेलन उत्साहात

## तरुण उद्योजक आणि विशेष कार्य करणाऱ्यांचा सन्मान

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त माणगाव तालुक्यातील युवकांना राष्ट्रनिर्माण, संस्कृती, व्यक्तिमत्त्व विकास आणि आर्थिक शिस्तीची प्रेरणा देणारे तालुकास्तरीय युवा संमेलन उत्साहपूर्ण वातावरणात अशोकदादा साबळे विद्यालयात झाले. तालुक्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या युवा उद्योजक व गुणवंत युवकांचा यावेळी मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन विवेक विचार मंचचे संयोजक विजय वेदपाठक, पोस्को कंपनीचे सीएसआर प्रमुख कुलदीप पुरंदरे, आर्थिक सल्लागार जय विलास मयेकर आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माणगाव तालुका कार्यवाह अजित शेडगे यांच्या हस्ते झाले.




यावेळी लोणेरे येथील उद्योजक नरेश टेंबे, गोरेगावचे सुलेखनकार भावित तोडणकर, माणगावचे उद्योजक रोशन पवार, क्रीडा क्षेत्रातील खेळाडू श्रेयस गमरे आणि वैद्यकीय क्षेत्रातील श्रेयस कुलकर्णी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

आर्थिक सल्लागार जय विलास मयेकर यांनी युवकांनी आपल्या आयुष्याच्या सुरुवातीपासूनच आर्थिक शिस्त अंगीकारण्याचे आवाहन केले. उत्पन्न, बचत, गुंतवणूक आणि खर्च यांचा योग्य समतोल साधल्यास भविष्यातील अनेक अडचणी टाळता येतात. युवा अवस्थेत आर्थिक शिस्त लावली, तर जीवनातील अनेक बाबी अधिक सुकर होतात, असे त्यांनी मार्गदर्शन करताना स्पष्ट केले.

पोस्को कंपनीचे सीएसआर प्रमुख कुलदीप पुरंदरे यांनी युवकांना स्वपरिचय पत्र अर्थात बायोडाटा कसा तयार करावा, स्वतःचे व्यक्तिमत्त्व प्रभावी कसे घडवावे आणि व्यावसायिक जगात स्वतःची ओळख कशी निर्माण करावी याबाबत मार्गदर्शन केले. कौशल्य, आत्मविश्वास, शिस्त आणि सकारात्मक दृष्टिकोन ही यशस्वी व्यक्तिमत्त्वाची महत्त्वाची वैशिष्ट्ये असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रमुख वक्ते विजय वेदपाठक यांनी भारताचे परम वैभव, भारतीय परंपरा, देशाची सद्यस्थिती आणि राष्ट्रजीवनातील संघाचे महत्त्व यावर विचार मांडले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेमागील प्रेरणा आणि राष्ट्रनिर्माणाच्या कार्यात युवकांची भूमिका यावर त्यांनी विशेष प्रकाश टाकला.

भारतीय संस्कृतीचा अभिमान, राष्ट्राविषयीची निष्ठा आणि समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द या गुणांनी सज्ज झालेली युवाशक्तीच भारताला परम वैभवाच्या दिशेने घेऊन जाऊ शकते, असा प्रेरणादायी संदेशही त्यांनी युवकांना दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सहकार्यवाह विशाल गायकवाड व सूत्रसंचालन निनाद पाटील यांनी केले, तर उपस्थितांचे आभार राज खाडे यांनी मानले.



**मुरूड : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठ फुलू लागली आहे. ग्रामीण भागातून आलेली फळे, फुले, राजभाज्यांची बाजारात मोठ्या प्रमाणात आवक दिसून येत आहे.**
(छाया : सुधीर नाझरे)


जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७ / म.प्र –१, दि. १८/१०/२०२३

परिशिष्ट – ३

(ई–निविदेसाठी जाहिरात नमुना)

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड ई–मेल :– eerid२४@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७

**ई–निविदा सूचना क्र. ७१ सन २०२६–२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई – निविदा सूचना व ई– निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भिरा उन्नैयी धरणाची परिपुर्ण दुरुस्ती (अश्मपटल दुरुस्ती, धरण माथ्यावरील रस्त्याची दुरुस्ती, वक्राकार द्वारांची दुरुस्ती) व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.२१२१६१५८/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |
| २. | भिरा उभेयी धरणाची परिपुर्ण दुरुस्ती (अश्मपटल दुरुस्ती, धरण माथ्यावरील रस्त्याची दुरुस्ती, वक्राकार द्वारांची दुरुस्ती) व इतर अनुषंगिक कामे करणे. | रु.२१२१७५४९/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |

**निविदा उपलब्ध कालावधी – दि. ११/०९/२०२६ ते दि. १८/०९/२०२६**
**निविदा उघडण्याचा दि. २१/०९/२०२६**
**खालील संकेतस्थळावर ई–निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:– कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई–मेल eerid२४@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई– निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
**टिप :– निविदा भरतांना आपले दर G.S. T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

सही/–
( इंजि. राकेश धाकतोडे)
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.

**क्रमांक : आरओसी/२०२६–२७/क्र.–५/सी २७९२**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

//उद्यमात सकल समृद्धिः//
मऔविम

ई निविदा सूचना क्रमांक ३१/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | दिघी बंदर औद्योगिक क्षेत्र (डीपीआयए)... रातवाड, जिल्हा रायगड येथे मेगा लेदर फुटवेअर आणि ॲक्सेसरीज क्लस्टरसाठी पायाभूत सुविधांचा विकास करणे...खोऱ्याच्या भागात गॅबियन भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ४०,०२,१२९.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... पोलादपूर येथील सावित्री धरणावर आवश्यक उपकरणांसह पूर्वसूचना प्रणालीचा पुरवठा करून, बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ ३९,९५,३१४.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजना, सांडपाणी निःसारण योजना, फायर स्टेशन व अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती अंतर्गत विविध परिसरांची देखभाल व नियमित दुरुस्ती एक वर्षाच्या कालावधीसाठी करणे. | ₹ ३३,०८,६७८.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्र.. रोहा औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती........ रोहा बायपास रोडवरील बूस्टर पंपाचे परिचालन व देखभालीकरीता सेवा पुरवणे . | ₹ २३,९१,३३६.०० |
| ५ | अतिरिक्त महाड व पंचतारांकित औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.... महाड येथे वितरण ट्रान्सफॉर्मरसह डीपी स्ट्रक्चरचा पुरवठा करून उभारणे व कार्यान्वित करणे. | ₹ १६,१५,४८३.०० |
| ६ | महाड व विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा, निवासी व अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती... महाड व विळे भागाड औद्योगिक क्षेत्रातील विद्युत उपकरणांची वार्षिक तत्वावर देखभाल व किरकोळ दुरुस्ती करणे. | ₹ ११,७०,८६५.०० |
| ७ | तळोजा औद्योगिक क्षेत्रातील अग्निशमन केंद्राची देखभाल व दुरुस्ती.. तळोजा अग्निशमन केंद्राच्या इमारतींमध्ये किरकोळ दुरुस्ती करणे. | ₹ ३९,९८,६५३.०० |
| ८ | पाताळगंगा येथील नवीन पाणी पुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. इसांबे शुद्ध जलउदंचन गृहाकरीता १ वर्षाच्या कालावधीसाठी परिचालनाची सेवा पुरविणे. | ₹ २६,४७,५००.०० |
| ९ | खांदा कॉलनी पनवेल येथील अनिवासी इमारतीची देखभाल व दुरूस्ती..... खांदा कॉलनी पनवेल येथील प्रशासकीय इमारतीमधील विद्यमान ६ केव्हीए यूपीएस आणि एसएमएफ बॅटरी बदलणे. | ₹ ३,३८,४०३.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक १७/०९/२०२६ ते दिनांक ०१/१०/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २१/०९/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २४/०९/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.



जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्रमांक निविदा ०४१७/प्र.क्र.२४७ / म.प्र –१, दि. १८/१०/२०२३

परिशिष्ट – ३

(ई–निविदेसाठी जाहिरात नमुना)

**महाराष्ट्र शासन**

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**

रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड ई–मेल :– eerid२४@gmail.com दुरध्वनी क्र. ०२१४०/२५०८५७

**ई–निविदा सूचना क्र. ६७ सन २०२६–२७**

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीन कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि. रायगड पिन नं.४०२३०४ हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामाकरीता ई–निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेस्थळ https://mahatenders.gov.in येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर ई – निविदा सूचना व ई– निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार **कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४** यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचनेमध्ये काही बदल होत असल्यास https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदेची किंमत रु. लक्ष (विमा सहीत) | इसारा रक्कम रु. | काम पुर्ण करणेचा कालावधी | ई-निविदा संचाची किंमत रु. | कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजनाला मध्यम प्रकल्प पाली पोटल कालव्यावरील वितरिका, एकूण लांबी सहा किलोमीटर येथे कालव्यावरील बांधकामे, गाव रस्ता पुल, एस्केप, एचपीडी, सुपर पॅसेज आणी सायफन पुर्नबांधणी करणे, अस्तरीकरण करणे, सर्व पथावरील भराव करणे इतर आवश्यक अनुषंगिक काम करणे. | रु.२१२१७६२७/- | १,५०,०००/- | ०६ महिने | रु.२०००/- + रु. ३६०/- २३६०/- (ना-परतावा) | लागु नाही |

**निविदा उपलब्ध कालावधी – दि. ११/०९/२०२६ ते दि. १८/०९/२०२६**
**निविदा उघडण्याचा दि. २१/०९/२०२६**
**खालील संकेतस्थळावर ई–निविदाबाबत सर्व माहिती उपलब्ध आहे.**

१. संकेतस्थळ https://www.mahatenders.gov.in
२. कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता. रोहा, जि.रायगड या कार्यालयातील सूचना फलक.
३. जलसंपदा विभागाचा दि.१८/१०/२०२३ रोजीच्या सुधारीत शासन निर्णयान्वये कार्यवाही करणेत यावी.
४. पत्रव्यवहारासाठी संपर्क व्यक्ती व पत्ता:– कार्यकारी अभियंता, रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड, ता.रोहा, जि.रायगड पिन नं.४०२३०४ ई–मेल eerid२४@gmail.com
५. निविदा सादर करण्यासाठी निविदाकार यांनी केलेल्या आर्थिक खर्चास जबाबदार न राहता कोणतीही एक किंवा सर्व निविदा फेटाळण्याचा किंवा संपुर्ण निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्याने राखुन ठेवलेले आहेत.
६. निविदा प्रक्रियेमध्ये पश्चात अर्हता निकष ठेवण्यात आलेले आहेत.
७. ई– निविदा प्रक्रियेसाठी कोणत्याही परिस्थितीत निविदाकाराकडून निविदा छापील प्रतिच्या (Hard Copy) स्वरुपात स्वीकारली जाणार नाही.
**टिप :– निविदा भरतांना आपले दर G.S. T. वगळून भरणे बंधनकारक आहे. G.S.T. चे दर संबंधीत विभागाचे नियमाप्रमाणे लागू राहतील.**

सही/–
( इंजि. राकेश धाकतोडे)
कार्यकारी अभियंता,
रायगड पाटबंधारे विभाग, कोलाड.

**क्रमांक : आरओसी/२०२६–२७/क्र.–५/सी २७८८**

## एएचएफ ज्युनियर आशिया कप स्पर्धा

# भारतीय संघांची उपांत्य फेरीत धडक

**मोकी (चीन) : वृत्तसंस्था**

**एएचएफ ज्युनियर आशिया कपमध्ये भारताच्या पुरुष आणि महिला संघांनी आपली विजयी घोडदौड कायम राखत उपांत्य फेरीत धडक दिली आहे. उपांत्यपूर्व फेरीत महिला संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानचा १९–० असा धुव्वा उडवला, तर पुरुष संघाने चायनीज तैपेईविरुद्ध १५–० अशी धूळ चारली. या विजयांमुळे भारताचे दोन्ही संघ आता चषकाच्या विजेतेपदापासून अवघ्या एक पावलावर आहेत.**

## महिलांकडून पाकिस्तानचा धुव्वा



स्पर्धेतील पहिल्या उपांत्यपूर्व फेरीत भारतीय संघाने पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेल्या पाकिस्तानचा १९–० असा धुव्वा उडवला. हा विजय इतका मोठा होता की, या संपूर्ण स्पर्धेच्या इतिहासातील हा कोणत्याही एका संघाचा सर्वात मोठा आणि एकतर्फी विजय ठरला आहे.

सामन्याच्या सुरुवातीपासूनच भारतीय खेळाडूंनी मैदानावर पूर्णपणे आपले वर्चस्व राखले होते. सामन्याच्या सातव्या मिनिटाला पूजा साहू हिने पेनल्टी कोर्नरवर पहिला गोल करत भारताचे खाते उघडले. पहिल्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने एकूण पाच गोल करत पाकिस्तानवर प्रचंड दडपण निर्माण केले. हीच लय कायम ठेवत दुसऱ्या क्वार्टरमध्येही भारतीय मुलींनी गोल डागणे सुरूच ठेवले. तिसऱ्या आणि चौथ्या क्वार्टरमध्येही पाकिस्तानच्या बचावफळीला निष्प्रभ करत भारतीय संघाने जोरदार आक्रमण केले आणि सामन्यात तब्बल १९ गोलची नोंद केली.

या ऐतिहासिक विजयात भारतीय खेळाडूंच्या उत्कृष्ट सांघिक कामगिरीचे दर्शन घडले, कारण संघातील एकूण १३ खेळाडूंनी गोल नोंदवले. या सामन्यातील मुख्य आकर्षण ठरली ती पूजा मलिक, जिने २७व्या, ४९व्या आणि ५१व्या मिनिटाला सुरेख गोल करत आपली हॅट्ट्रिक पूर्ण केली. तिच्यासोबतच रोशनी, सनिका चंद्रकांत माने, मधू सिदर आणि सुप्रिया यांनी प्रत्येकी दोन–दोन गोल केले, तर उर्वरित इतर खेळाडूंनी प्रत्येकी एक गोल करून संघाला या ऐतिहासिक विजयापर्यंत पोहोचवले.

दोन वेळा चॅम्पियन राहिलेला भारतीय ज्युनिअर महिला संघ या संपूर्ण स्पर्धेत अद्याप एकही सामना हारलेला नाही. साखळी फेरीत चीनविरुद्धचा सामना अनिर्णीत राहिल्यानंतर भारताने जपान, दक्षिण कोरिया आणि मलेशिया या सर्वच संघांवर मात केली आहे. या भव्य विजयानंतर आता उपांत्य फेरीत भारतीय संघाचा सामना दक्षिण कोरिया किंवा मलेशिया या संघांपैकी एकाशी होणार आहे, जिथे भारतीय मुली आपली विजयी मालिका कायम ठेवण्याच्या ध्येयाने मैदानात उतरतील.

## पुरुषांनी चायनीज तैपेईची उडवली दाणादाण

पूल 'अ'मधील आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात भारतीय पुरुष संघाने चायनीज तैपेईविरुद्ध १५–० असा दणदणीत विजय मिळवत दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. या संपूर्ण सामन्यात भारताचा कर्णधार अनमोल एक्काने तब्बल सहा गोल करत विजयात सर्वात महत्त्वाची आणि निर्णायक भूमिका बजावली.

गतविजेत्या भारतीय संघाने एएचएफ ज्युनियर आशिया कपमध्ये आपली विजयी घोडदौड कायम राखत धमाकेदार कामगिरी केली आहे. पूल 'अ'मधील आपल्या अखेरच्या साखळी सामन्यात भारताने चायनीज तैपेईविरुद्ध १५–० असा दणदणीत विजय मिळवत दिमाखात उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. या संपूर्ण सामन्यात भारताचा कर्णधार अनमोल एक्काने तब्बल सहा गोल करत विजयात सर्वात महत्त्वाची व निर्णायक भूमिका बजावली.



सामन्याच्या पहिल्या क्वार्टरमध्ये चायनीज तैपेईने मजबूत आणि अभेद्य बचाव करत भारताचे सर्व आक्रमक प्रयत्न हाणून पाडले आणि सर्वांना आश्चर्यचकित केले. भारताने चेंडूवर ताबा ठेवून अनेक गोल करण्याच्या संधी निर्माण केल्या होत्या, पण तैपेईचा बचाव भेदण्यात सुरुवातीला यश आले नाही, मात्र या दोन मिनिटांच्या विश्रांतीदरम्यान मुख्य प्रशिक्षक फ्रेडरिक सोयेझ यांनी खेळाडूंना अधिक आक्रमकपणे खेळण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले, ज्याचा थेट आणि सकारात्मक फायदा पुढील सामन्यात दिसून आला.

दुसऱ्या क्वार्टरच्या सुरुवातीलाच १७ व्या मिनिटाला आर्यन एक्सने भारतासाठी पहिला गोल करत खाते उघडले, तर अवघ्या एका मिनिटानंतर (१८व्या मिनिटाला) प्रभदीप सिंगने गोल नोंदवून आघाडी २–० केली. त्यानंतर गुरसेवक सिंगने २२व्या मिनिटाला तिसरा गोल केला. मग कर्णधार अनमोल एक्काने आपला करिष्मा दाखवत २५व्या मिनिटाला पेनल्टी कॉर्नरचे गोलमध्ये रूपांतर केले व स्वतःचे खाते उघडले. अर्जुन संतोष हरगुडेने २८व्या मिनिटाला पाचवा गोल केला, तर पुढच्याच मिनिटाला अनमोलने पुन्हा एकदा पेनल्टी कॉर्नरवर गोल करत मध्यंतरापर्यंत भारताला ६–० अशी भक्कम आघाडी मिळवून दिली.

तिसऱ्या क्वार्टरमध्ये भारतीय संघाने अधिकच आक्रमक पवित्रा धारण केला. अनमोलने तिसऱ्या क्वार्टरच्या पहिल्या तीन मिनिटांत सलग दोन पेनल्टी कॉर्नरवर गोल करत आपली शानदार हॅट्ट्रिक पूर्ण केली आणि पाठोपाठ आणखी एक गोल करत आपल्या वैयक्तिक गोलची संख्या चारवर नेली. त्यानंतर अजित यादवने ३५व्या मिनिटाला एका सुरेख मैदानी गोलने भर घातली. ४५व्या मिनिटाला पुन्हा एकदा अनमोलने पेनल्टी कॉर्नरवर पाचवा गोल नोंदवत भारताची धावसंख्या १०–०वर पोहोचवली.

सामन्याच्या शेवटच्या चौथ्या क्वार्टरमध्येही भारताचा गोल वर्षाव सुरूच राहिला. हरपालने ४८व्या मिनिटाला मैदानी गोल केला, तर ५१व्या मिनिटाला कर्णधार अनमोल एक्काने आपला सहावा पेनल्टी कॉर्नर गोल पूर्ण केला. यानंतर हरपालने आपला दुसरा गोल केला, तर आर्यन एक्सनेही सामन्यात दोन गोल करत आपले योगदान दिले. अशा प्रकारे निर्धारित वेळेत भारतीय संघाने १५–० असा ऐतिहासिक विजय नोंदवला.

## ईस्ट झोनने दुलीप ट्रॉफी जिंकली



**चेन्नई : वृत्तसंस्था**

गेल्या तब्बल १३ वर्षांपासून ज्या क्षणाची आतुरतेने प्रतीक्षा होती, तो ऐतिहासिक पराक्रम अखेर कर्णधार ईशान किशनने करून दाखवला आहे. दुलीप करंडकाच्या अंतिम फेरीत साऊथ झोनवर वर्चस्व गाजवत ईस्ट झोनच्या संघाने अजिंक्यपदावर आपले नाव कोरले. हा अंतिम सामना अनिर्णित राहिला असला, तरी पहिल्या डावातील भक्कम आघाडीच्या जोरावर ईस्ट झोनला अधिकृतपणे विजेता घोषित करण्यात आले.

अंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ईस्ट झोनने फलंदाजांच्या दर्जेदार कामगिरीच्या जोरावर पहिल्या डावात ७०८ धावांचा महाकाय डोंगर उभा केला. यामध्ये कर्णधार ईशान किशनच्या झंझावाती २७० धावांचा सिंहाचा वाटा राहिला. या धावसंख्येचा पाठलाग करताना साऊथ झोनचा संपूर्ण संघ पहिल्या डावात अवघ्या ३३६ धावांवर गारद झाला.

ईस्ट झोनकडे साऊथ झोनला फॉलोऑन देऊन पुन्हा फलंदाजीस पाचारण करण्याची उत्तम संधी होती, परंतु कर्णधार ईशानने सुरक्षित रणनीती आखत स्वतः पुन्हा फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ईस्ट झोनने दुसऱ्या डावात ७ बाद ३८८ धावा उभारल्यानंतर हा सामना अनिर्णित म्हणून घोषित करण्यात आला आणि पहिल्या डावातील भक्कम आघाडीच्या निकषावर ईस्ट झोनने अधिकृतपणे विजेतेपदाचा करंडक आपल्या नावावर केला. साऊथ झोनचा कर्णधार तिलक वर्मा याने अंतिम लढतीत ९९ धावांची झुंजार खेळी साकारली, मात्र ईस्ट झोनच्या आव्हानापुढे त्याची ही एकाकी झुंज अपुरी पडली.

### 'ई'शानदार कामगिरी

या ऐतिहासिक विजयात कर्णधार ईशान किशनचे योगदान अत्यंत मोलाचे ठरले. त्याने केवळ बॅटनेच धावांचा डोंगर रचला नाही, तर मैदानावर कर्णधार म्हणून मोक्याच्या क्षणी घेतलेले रणनीतिक निर्णय ईस्ट झोनसाठी विजेतेपद मिळवून देणारे ठरले. विशेष म्हणजे, सय्यद मुश्ताक अली स्पर्धेच्या अंतिम फेरीत सामनावीर पुरस्कार पटकावणाऱ्या ईशानने पूर्णपणे वेगळ्या फॉरमॅट खेळल्या गेलेल्या दुलीप करंडकाच्या अंतिम सामन्यातही पुन्हा एकदा सामनावीरचा किताब पटकावण्याचा अनोखा पराक्रम केला.

# स्टार गोलंदाज जसप्रीत बुमराह फिट

## हर्षित राणाच्या जागी यश ठाकूरचाही संघात समावेश

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा स्टार वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह पूर्णपणे तंदुरुस्त (फिट) झाला असून तो आगामी अफगाणिस्तानविरुद्धच्या टी–२० मालिकेसाठी आणि २०२६च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी उपलब्ध असणार आहे. दुसरीकडे, नवोदित वेगवान गोलंदाज हर्षित राणाला पुन्हा एकदा दुखापतीचा फटका बसला असून तो या दोन्ही महत्त्वाच्या मोहिमांमधून बाहेर पडला आहे.



बीसीसीआयच्या सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये पुनर्वसन प्रक्रियेदरम्यान राणाच्या तंदुरुस्तीत चांगली सुधारणा होत होती, मात्र ७ सप्टेंबर रोजी झालेल्या एका मॅच सिम्युलेशनदरम्यान गोलंदाजी करताना त्याच्या मांडीच्या स्नायूला गंभीर दुखापत झाली. या दुखापतीमुळे तो संघातून बाहेर पडला असून त्याच्या जागी विदर्भाचा वेगवान गोलंदाज यश ठाकूरला संघात संधी देण्यात आली आहे.

२७ वर्षीय यश ठाकूर हा विदर्भाचा वेगवान गोलंदाज असून त्याने यावर्षी जुलैमध्ये झालेल्या झिम्बाब्वे दौऱ्यातून टी–२० आंतरराष्ट्रीय पदार्पण केले होते. त्या दौऱ्यात दोन सामने खेळताना त्याने चार बळी टिपले होते तसेच सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीच्या ५० सामन्यांमध्ये ७.०४च्या इकॉनॉमी रेटने ८१ बळी घेण्याची चमकदार कामगिरी त्याच्या नावावर आहे.

दरम्यान, बुमराहचे संघात पुनरागमन झाल्याने भारतीय गोलंदाजीला मोठी ताकद मिळाली आहे. तो आता अर्शदीप सिंग आणि यश ठाकूर यांच्या साथीने गोलंदाजीचा भार सांभाळेल. या दोन्ही मोहिमांमध्ये श्रेयस अय्यर संघाचे नेतृत्व करणार असून तिलक वर्माकडे उपकर्णधारपद आहे.









दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com